दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

तिवरे शाळेचे शिक्षक रविंद्र आंधळे यांचा जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात तिसरा क्रमांक
कळंबोली येथे संपन्न झाले ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन

पाली, ता. १ (अमित गवळे) सुधागड तालुक्यातील तिवरे शाळेचे शिक्षक रविंद्र आंधळे यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिक्षक प्रतिकृतीमध्ये तिसरा क्रमांक पटकावला आहे. कळंबोली ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. बुधवारी (ता.३१) दुपारी बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. रवींद्र आंधळे यांनी हसत खेळत ज्ञानरचनावाद ही प्रतिकृती तयार केली होती. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन रविंद्र आंधळे यांना गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील शिक्षक, विद्यार्थी, नातेवाईक, मित्रपरिवार व मान्यवरांनी रवींद्र आंधळे यांचे अभिनंदन केले.

* (आष्टी) वर्धा * शुक्रवार दि.०२/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २०६ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

परभणी पोलीस अधीक्षक पदी रवींद्र सिंह परदेशी



दै. जनप्रभात
परभणी / अरविंद कांबळे

परभणी, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे गृह खात्याने जबरदस्त पोलीस अधिकाऱ्यांच्या ३१ जानेवारी बुधवार रोजी मोठ्या प्रमाणात बदल्या केल्यास परभणीतील पोलीस अधीक्षक श्रीमती रागसुधा आर यांची मुंबई पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यामुळे परभणी येथील जागेवर चंद्रपूर वरून रवींद्र सिंह परदेशी यांची परभणी पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात बदल्या केल्यामुळे अनेक अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश आहे.

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्नेह-संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद. माजी मंत्री राजेंद्र मुळक यांची प्रमुख उपस्थिती.



दै.जनप्रभात
जयश्री मेंघरे /प्रतिनिधी

रामटेक - राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या* स्नेह-संमेलनाला राजेंद्र मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपुर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) व *आनंदरावजी देशमुख * (अध्यक्ष रा.आ.वि.शी मंडळ, रामटेक तथा माजी आमदार) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी हेमराज त्रिपाठी साहेब (कुलगुरू कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक), रमेश कारामोरे (जिल्हा अध्यक्ष,प्रहार), वंदना सवरंगपते(उपविभागीय अधिकारी रामटेक महसूल विभाग),आशिष कांबळे(आय.पी.एस उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक), विजय भाकरे गट शिक्षणाधिकारी प.स.रामटेक), डॉ.कमलाकर लेंडे (अध्यक्ष रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), मा.श्री.मयंक देशमुख (सचिव रा.आ. वि.शी मंडळ रामटेक). नारायण देशमुख (सहसचिव रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), अंशुल देशमुख (कोषाध्यक्ष रा.आ. वि.शी. मंडळ रामटेक), मा.श्री.शमराव सेलोकर (सदस्य रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), मा.श्री. नीलकंठ महाजन (सदस्य रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), मा.श्री.घनश्याम बर्वे(सदस्य रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), मा.सौ.जयश्रीताई रागीट(सदस्य रा.आ.वी.शी मंडळ रामटेक), मा.श्री.हेमराज हजारे (सदस्य रा.आ.वी.शी मंडळ रामटेक),अश्विन सहारे, श्री.वसीम कुरेशी, श्री.स्नेहदीप वाघमारे, श्री.आशिष थोटे, अक्षय गजभिये, शांतनु बावनकुळे, हरीश माकडे, हर्षल महाजन,उद्देश लाबडे इत्यादी मान्यवर मंडळी शिक्षकगण तथा विद्यार्थी उपस्थित होते.

आदिवासी भागातील कुपोषण आणखी कमी करण्यासाठी सरपंचांचा सहभाग घ्यावा

चावडी वाचन, शिबिरे मोठ्या प्रमाणावर घेऊन जनजागृती करावी - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. जनप्रभात

मुंबई, :- आदिवासी भागातील पोषण आहार आणि आरोग्य सेवा सुधारण्यावर राज्य शासनाचे विविध विभाग समन्वयाने काम करीत असल्याने कुपोषणाचे प्रमाण कमी होताना दिसते. मात्र, कृती दलाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करून हे प्रमाण आणखी कमी झाले पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याकामी सरपंचांचा सहभाग वाढविण्याचे आणि आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर शिबिरे घेण्याचे निर्देश दिले. आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कृती दलाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांना कृती दलाचा पहिला अहवाल अध्यक्ष डॉ दीपक सावंत यांनी सुपूर्द केला. यावेळी अपर मुख्य सचिव (गृह) सुजाता सौनिक, महिला व बालविकास सचिव अनुपकुमार यादव आणि कृती दलातील विविध विभागांचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.प्रारंभी विभागाने केलेल्या सादरीकरणात गेल्या तीन वर्षात आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण १.८२ टक्क्यांवरुन १.६२ टक्के इतके कमी झाल्याचे आणि उर्वरित राज्यातील कुपोषणाचे प्रमाण १.४३ टक्क्यांवरून १.२२ टक्के इतके कमी झाल्याची माहिती देण्यात आली. आरोग्य सेविका, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका व आयुष यांच्या जोडीने सरपंचांशी देखील समन्वय साधून आरोग्य आणि



पोषण सेवा देण्यात येत आहेत अशी माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले

कुपोषणविषयक कृती दलाचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सुपूर्द

की, ग्रामविकासात सरपंचांची मोठी भूमिका असते. सरपंचांचे देखील आपापल्या गाव, पाड्यामधील कुपोषण कमी करण्यात सहभाग असणे गरजेचे आहे. चावडी वाचन, शिबिरे या माध्यमातून कुपोषित महिला, बालकांची माहिती वेळीच प्रशासनाला कळेल आणि त्यावर त्वरेने उपाययोजना करता येतील.माध्यान्ह भोजन आठवीपुढे सुद्धा सध्या आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन देण्यात येते. ही योजना नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना देखील देण्यासंदर्भात तसेच अमृत आहार योजना शहरी भागात देखील देण्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणण्याच्या सूचना देखील यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिल्या. कुपोषण ही गंभीर समस्या आहे. संबंधित सर्व विभागांनी एकत्रित समन्वयाने काम करून उचित पाऊले टाकली पाहिजे. कुपोषणात देशाच्या आकडेवारीत महाराष्ट्र सर्वात शेवटी हवा असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, यामध्ये आदिवासी भागात एखादी महिला गरोदर राहिल्यापासून तिचे आरोग्य, आहारावर सातत्याने आरोग्य, महिला व बालविकास विभागाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. लेक लाडकी योजनेविषयी देखील आदिवासी भागात चांगला प्रसार झाला पाहिजे. मेळघाट, पालघरप्रमाणे इतरत्रही दुचाकी रुग्णवाहिका किंवा नौका रुग्णवाहिका कायम तयार असल्या पाहिजेत. दुर्गम गावे आणि पाड्यांमध्ये किमान एखादे वाहन आपत्कालीन परिस्थितीत जाण्यायेण्यासाठी साधी वाट हवी यासाठी लवकरच वन विभागाची बैठक घेण्याच्या सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी दिल्या.डेटा एकत्रित झाल्याने लाभ या कृती दलाने केलेल्या शिफारशींवर उत्तमरीत्या कार्यवाही झाल्याचे अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी सांगितले. सर्व संबंधित विभाग प्रथमच एकत्र येऊन काम करीत आहेत, त्यामुळे त्यांच्यात योग्य समन्वय आहे. कुपोषित बालके व महिलांचा डेटा एकत्रित संकलित केला जात असल्याने वेळीच माहिती मिळत आहे. हिमोग्लोबिनकडे सातत्याने लक्ष देणे गरजेचे पोषणाचे व्हिडिओ आदिवासींच्या भाषेत भाषांतर करून प्रसारित करणे, पोषण ट्रेकरचे विश्लेषण करणे, अती तीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्रांचा सुधारित दर, मध्यम कुपोषित बालकांकडे देखील लक्ष देणे व त्यांना अतिरिक्त पोषण देणे, बालकांच्या पोषणाची चावडी वाचनाडरे माहिती देणे, आश्रमशाळेने एक नर्स, आणि क्रीडा शिक्षकाची नेमणूक करणे, किशोरवयीन मुलींच्या हिमोग्लोबिन तपासणीसाठी डिजिटल मीटर उपलब्ध करणे, गर्भवती महिलांना ॲनिमिया कमी करण्यासाठी लोहयुक्त गोळ्यांऐवजी एमएमएस देणे अशा शिफारशी करण्यात आल्याचे डॉ. सावंत यांनी यावेळी सांगितले. कृती दलाने केलेल्या काही सूचनांवर कार्यवाही झाली असून गरोदर स्त्रियांना देण्यात येणाऱ्या एकवेळच्या चौरस आहार दरात ३५ रुपयांवरून ४५ रुपये वाढ झाली आहे. मध्यम कुपोषित बालकांसाठी अतिरिक्त पोषण आहार कार्यक्रम सुरु झाला आहे. सरपंचांना देखील सहभागी करणे सुरु

ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ग्रामरोजगार सेवक होणार आता ग्रामरोजगार सहायक ग्रामरोजगार सेवकांचा गटविमा काढण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

दै. जनप्रभात

मुंबई, दि. १ : ग्रामपंचायतस्तरावर काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांच्या विविध मागण्यांबाबत राज्य शासन सकारात्मक असून ग्रामरोजगार सेवकांचा गटविमा काढण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. ग्रामरोजगार सेवकांच्या पदनामात बदल करुन ते ग्रामरोजगार सहायक असे करण्यात येईल, असे जाहीर करतानाच मानधनात वाढ करण्यासाठी अन्य राज्यात यासंदर्भात घेतलेल्या निर्णयांची माहिती घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.राज्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या विविध मागण्यांबाबत चर्चेसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, रोजगार हमी विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, रोहयो मिशन महासंचालक नंदकुमार यांच्यासह ग्राम रोजगार सेवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिलेख आणि नोंदवह्या आदी कामांसाठी ग्रामसेवकांना मदतनीस म्हणून ग्रामरोजगार सेवकांच्या सेवा घेण्यात आल्या आहेत. राज्यात २६ हजार ६०० ग्रामरोजगार सेवक ग्रामपंचायतस्तरावर कार्यरत असून त्यांना कामाच्या प्रमाणानुसार मानधन दिले जाते. सध्या मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्यासाठी अन्य राज्यात या ग्रामरोजगार सेवकांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयांची माहिती घेऊन सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.ग्रामरोजगार सेवकांना सध्या विमा कवच नसल्याने अपघात किंवा इतर कारणांमुळे मृत्यू झाल्यास कुटुंबियांचे हाल होतात, ही बाब लक्षात आल्यावर ग्रामरोजगार सेवकांचा गटविमा काढण्याचे



निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. कोरोना काळात मृत्यू झालेल्या ग्रामरोजगार सेवकांची माहिती संकलित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

उमंग गीताई कॉलेज येथे दीक्षांत समारोह साजरा



दिलीप येवले /प्रतिनिधी

कोराडी :- उमंग गीताई कॉलेज ऑफ वूमेन्स एजुकेशन कोराडी रोड पांजरा नागपूर येथे दीक्षांत समारोह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून संचालक वैशाली फुले, अल्पशा फुले उपस्थित होते. ह्या प्रसंगी महाविद्यालयातील संचालक_वैशाली फुले ह्याच्या हस्ते विद्यार्थिनींना पदवी देण्यात आल्या. संचालक वैशाली फुले ह्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनण्यास प्रेरित केले त्यांनी महाविद्यालयात शिकत असलेले कोर्से स हे स्वावलंबी बनून स्वतःचा स्वयंरोजगार प्रस्थापित करण्यासारखे आहेत जेणेकरून आपण स्वतःला आणि आपल्या कुटूंबाला आधार देऊ शकतो असे संबोधित केले. महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक ह्यांनी विद्यार्थिनींना त्यांच्या उज्वल भविष्याकरिता मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थिनींनी महाविद्यालयात ३ वर्षायात अनुभवलेल्या गोष्टी सांगितल्या. कार्यक्रमाचे संचालन सा. प्रा डॉ. मेरी लुइस, सा. प्रा. कु. तृप्ती डोंगरे ह्यांनी केले. कार्यक्रमात सा. प्रा. अश्विन अंजीकर, सा. प्रा मयूर जलवानीया, सा. प्रा. प्रीती मानकर, सा. प्रा प्राची रंगारी, सा. प्रा मोनाली रामधाम, सा. प्रा प्राची शर्मा, सा. प्रा दीपिका श्रेष्ठा, सा. प्रा ग्रेसी राय, सा. प्रा पूनम सोनाने, सा. प्रा मोहिता जैतावार, सा. प्रा कोमल फुलझेले, पवन करमेले, निलेश मेश्राम, गौरव गावंडे, संगीता चौधरी, प्राची टेंबरे, कीर्ती भोरकर, मधुकर डांगे उपस्थित होते.

गाव चलो अभियान कार्यशाळा बैठक व भाजपा कार्यालयाचे उदघाट्न संपन्न!



दै.जनप्रभात
नवनाथ डिगोळे

भारतीय जनता पार्टी चाकुर शहर व ग्रामीण गाव चलो अभियान कार्यशाळा बैठक घेण्यात आली या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख मालक व प्रदेश प्रवक्ते तथा विधानसभा प्रमुख गणेश दादा हाके पाटील, व तालुका अध्यक्ष वसंतराव डिगोळे,जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे,जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर,युवा मोर्चा प्रदेश सचिव युवराज पाटील,संचालक तुकाराम मद्दे,संचालक दयानंद पाटील,जिल्हा उपाध्यक्ष हानमतराव पाटील,राजकुमार मजगे, शहर अध्यक्ष प्रशांत बिबराळे, नगरसेवक साई हिप्पाळे, विधानसभा विस्तारक चंद्रशेखर डांगे,रणजित मिरकले,युवा मोर्चा अध्यक्ष भरत गुरमे,अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष हकाणी सौदागर,तालुका सरचिटणीस अंकुश जनवाडे,ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष अशोक शेळके, ता.सरचिटणीस देवानंद वागलगावे महिला मोर्चा तालुका अध्यक्ष मनीषा नवने,ता. सरचिटणीस शिवाजी माने व भारतीय जनता पार्टी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

****

शिवसेना, युवासेना, महीला आघाडी पदाधिकारी यांची बैठक

दै. जनप्रभात
जयश्री मेंघरे /प्रतिनिधी

रामटेक - शिंदे बालासाहेब ठाकरे शिवसेना, युवासेना, महीला आघाडी पदाधिकारी यांची बैठक मा. शिवसेना उपजिल्हा प्रमुख ग्रामीण श्री वर्धराज जी पिल्ले यांचा अध्यक्षते मध्ये कन्हान येथे शिवसेन कार्यालय मध्ये सर्व शिवसेना पदाधिकार्यची विषेश बैटक दुपारी १ वाजता आयोजीत केली होती. या बैटकीला शिवसेना चे नागपुर ग्रामीण उपजिल्हा प्रमुख श्री वर्धराज जी पिल्ले, कन्हान नगर परीषद अध्यक्ष सौ. करुणाताई आष्टकर, कन्हान नगर परिषद उपाध्यक्ष डेनियल जी शेंडे, पारशिवनी नगर पंचायत चे माजी नगर अध्यक्ष सौ. प्रतीभाताई कुंभलकर, नागपुर जिल्हा महीला आघाडी प्रमुख सौ. घेघले ताई, नागपुर युवसेना जिल्हा प्रमुख राजेश गोमकाळे, नागपुर जिल्हा वैद्यकीय(आरोग्य) प्रमुख गौरव पनवेलकर,रामटेक विधानसभा सोशल मिडीया प्रमुखा दिपचंद जी शेंडे, नागपुर जिल्हा युवती प्रमुख मास्के ताई, पारशिवनी तालुका प्रमुख राजु भोस्कर,उप तालुका प्रमुख दिपक शिवरकर,नंदु लेकुरावडे, मंगेश बालगोटे,जिल्हा परीषद सर्कल प्रमुख गजानन जी गजभीये, शिवसेना कन्हान शहर प्रमुख गजानन गुहीरे,कन्हान महीला आघाडी प्रमुखा मनीषा ताई चिखले,,युवा सेना पारशिवनी शहर प्रमुख रोशन पिंपरामुळ,पंचायत समिती सर्कल प्रमुख, उपशाहर प्रमुख व सर्व पदाधिकारी बैटकीला उपस्थीत होते.



प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना

योजनेच्या अंमलबजावणीत वर्धा राज्यात चौथ्या क्रमांकावर , जिल्ह्यात २२० प्रकल्पांना मंजूरी, ३०० प्रकल्प प्रस्ताव मंजुरी प्रक्रियेत

दै. जनप्रभात
वर्धा, (जिमाका)/प्रतिनिधी :

कृषी आधारित सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग ठिकठिकाणी उभे रहावे, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रयत्नाने या योजनेची जिल्ह्यात उत्कृष्ट अंमलबजावणी करण्यात येत असून त्यामुळेच योजनेच्या कामात वर्धा जिल्ह्याने राज्यात चौथ्या क्रमांकाचे स्थान पटकाविले आहे.प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना पाच वर्षाच्या कालावधीसाठी कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक व गट लाभार्थी लाभ घेवू शकतात. वैयक्तिक उद्योग त्याचप्रमाणे सामायिक पायाभूत सुविधा आणि मार्केटिंग व ब्रॅन्डींग या घटकांचा लाभ लाभार्थ्यांस देण्यात येतो. योजनेमध्ये सहभागी लाभार्थ्यास प्रशिक्षण दिले जाते. अर्ज प्रक्रिया व बँकांडरा मंजुरी मिळविण्यासाठी जिल्हा संसाधन व्यक्ती लाभार्थ्यास ऑनलाइन अर्ज प्रक्रियेपासून ते बँकांडरा प्रकरण मंजूर करून घेण्याची प्रक्रिया तसेच उद्योग उभारणीनंतर मार्गदर्शन करते. योजनेतून जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यास कर्ज मिळावे आणि योजनेच्या अंमलबजावणीत जिल्हा अव्वल क्रमांकावर असावा यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित विभागांसोबतच बँकांचा वारंवार आढावा



घेतला. प्राप्त अर्ज व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा सातत्याने पाठपुरावा केल्याने बँकांनी पात्र लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचे प्रमाण वाढविले. यावर्षी लक्षांकापेक्षा अधिक पात्र लाभार्थ्यांस कर्ज वाटप केले जाणार आहे. यावर्षामध्ये जिल्ह्याला वैयक्तिक लाभार्थ्यांचे ३१३ प्रकल्प मंजुरीचे लक्षांक होते. आतापर्यंत २२० प्रकल्पांना बँकेकडून कर्ज मंजूरी मिळाली आहे. बँकेकडे सध्या ३०० प्रकल्प मंजुरीकरिता आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा पाठपुरावा व मार्गदर्शनामुळे मंजूर प्रकल्पांच्या आकडेवारीनुसार जिल्हा राज्यामध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. पुढील वर्षी जिल्हा राज्यात पहिल्या तिनमध्ये येण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. योजनेंतर्गत कर्ज प्रकरणे मंजुरीसाठी उत्तम काम केलेल्या बँकांचा प्रजासत्ताकदिनी सत्कार करण्यात आला. त्यात वर्धा येथील युनियन बँक व कॅनरा बँक तसेच सेवाग्राम येथील भारतीय स्टेट बँकेचा समावेश आहे. तसेच जिल्हा संसाधन व्यक्ती अजय मोरे व प्रक्षुपा सायंकाळ यांचा देखील प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत लाभार्थ्यांस ३५ टक्के अनुदान दिले जाते. कृषी पायाभूत सुविधा निधीअंतर्गत लाभार्थ्यांस घेतलेल्या कर्जावर ३ टक्के दराने व्याज परतावा दिला जातो. त्याचप्रमाणे इतर सामाजिक, आर्थिक विकास महामंडळांमार्फत व्याज परताव्याच्या योजनेचा लाभ या योजनेतील लाभार्थ्यांना घेता येतो.

होतकरू युवकांनी योजनेचा लाभ घ्यावा - राहुल कर्डिले

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना होतकरू युवक, गटांना उद्योजक बनविणारी अतिशय चांगली योजना आहे. विशेष म्हणजे उद्योग घटकासाठी घेतलेल्या कर्जावर ३५ टक्केपर्यंत अनुदान दिले जाते. यावर्षी लक्षांकापेक्षा अधिक घटक मंजूर करण्याचे आपले प्रयत्न आहे. त्यामुळे ईच्छूक व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

नवीन रास्तभाव, शिधावाटप दुकानासाठी अर्ज आमंत्रित

१६ फेब्रुवारी पर्यंत अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत

दै. जनप्रभात
वर्धा, (जिमाका)/प्रतिनिधी :

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अस्तित्वात असलेली शिधावाटप दुकाने काही कारणास्तव किंवा त्या क्षेत्रातील एककांमध्ये वाढ झाल्यामुळे वितरित करण्यात येणाऱ्या शिधावस्तू शिधापत्रिका धारकांना सहजपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने नवीन रास्तभाव, शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. नवीन रास्तभाव, शिधावाटप दुकानासाठी पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था), नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांचेकडून दि. १६ फेब्रुवारी पर्यंत सबंधित तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाकडे विहित मुदतीत स्वीकरण्यात येणार आहे.महिला बचत गटांना मंजूर केलेल्या रास्तभाव दुकानाचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांचे समुदायाव्दारे करणे आवश्यक राहील. तसेच संस्था, गट स्थानिक गावातील किंवा वार्डातील असणे आवश्यक आहे.

तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत, नगर पालिका व तहसील कार्यालयात जाहिरनामे प्रसिध्द करण्यात आले आहे. अर्जासोतबत कोणती कागदपत्रे जोडावी याची माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्वीकारण्यात येणार नाही, असे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

****

संपादकीय .....

आघाडीत समावेश की पुन्हा वंचितच?

देशात राज्यसभा निवडणुकीकरिता कार्यक्रम जाहीर झाला आहे. देशभरातील ५६ राज्यसभा सदस्य निवृत्त होत असून येत्या २७ फेब्रुवारी रोजी ही निवडणूक होणार आहे. त्यानंतर सुरू होईल ती लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी. भाजपने तर 'अब की बार चार सौ पार'चा नारा दिला आहे. त्या दृष्टीने भाजपने कंबर कसली आहे. त्यात २२ जानेवारी रोजी अयोध्येमधील भव्य राम मंदिर लोकर्पणाचे श्रेयदेखील भाजपच्या खात्यात गेले आहे, तर दुसरीकडे २०१९ नंतर पुन्हा एकदा एकत्र येण्याच्या गप्पा विरोधकांनी सुरू केल्या आहेत. त्या दृष्टीने विरोधकांनी 'इंडिया' ही आघाडीदेखील स्थापन केली आहे, पण लोकसभा निवडणुकांचा बिगुल वाजायच्या आतच एकेकाने यातून काढता पाय घेतला आहे. 'कोलांटउडी'बहाद्दर, जनता दल युनायटेडचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केंद्रातील भाजपला धूळ चारण्याचा विडा उचलला होता. त्यासाठी सगळ्या मोदी विरोधकांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले होते. त्यासाठी पहिली बैठक त्यांनी बिहारमध्ये घेतली होती.

अशी जय्यत तयारी सुरू असताना अचानक त्यांनी भाजपच्या तंबूत शिरून सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दिला. काँग्रेसचे जुने विरोधक असलेले तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी हे इंडिया आघाडीतून बाहेर पडतील हे अपेक्षितच होते. त्यामुळे दोघांनी 'स्वबळा'चा दिलेला नारा हा कोणालाही अचंबित करणारा नव्हता, पण आता प्रत्यक्षात निवडणूक प्रक्रियेला जेव्हा सुरुवात होईल, तेव्हा ही आघाडी राहते का? राहिलीच तर या आघाडीत नक्की किती पक्ष असतील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडी टिकेल न टिकेल, पण महाराष्ट्रात मात्र गेल्या दोन वर्षांतील फुटाफुटीचे, फोडाफोडीचे राजकारण पाहता आगामी लोकसभा निवडणूक महाविकास आघाडी एकत्रपणे लढवेल असेच चित्र आहे. महाविकास आघाडीत सध्याच्या घडीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष आहेत, पण आता त्यात भारतीय कम्युनिस्ट पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी आणि वंचित बहुजन आघाडी यांचा समावेश करण्यात आला आहे.विशेष म्हणजे ऐन लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर विरोधकांच्या आघाडीची साथ सोडत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत जाणारा नितीश कुमार यांचा जदयु महाराष्ट्रात मात्र भाजपविरोधात लढणार आहे. अशावेळी प्रचाराच्या वेळी महाराष्ट्रात येणार्या जदयुच्या 'स्टार प्रचारकां'चे नमके काय होणार? आम आदमी पार्टीचे शिवसेना ठाकरे गटाशी चांगले सूत जुळले आहे. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडीला आपची साथ मिळेलच. शिवाय महाराष्ट्राचा विचार करता शेकाप आणि सपा हे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळ आहेतचफक्त प्रश्न आहे तो प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीचा. या पक्षाला महाविकास आघाडीत सहभागी करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले असले तरी प्रकाश आंबेडकर यांनी मात्र बुधवारी याचा इन्कार केला आहे. प्रकाश आंबेडकर यांची भूमिका आधीपासूनच स्पष्ट आहे. शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे प्रादेशिक पक्ष असल्याने त्यांनी दिलेल्या मंजुरीला आक्षेप नाही, मात्र वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश करण्याच्या पत्रावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची सही आहे.

पण असे निर्णय घेण्याचे अधिकार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण तसेच बाळासाहेब थोरात यांना देण्यात आल्याचे आपल्याला सांगण्यात आले आहे, पण प्रत्यक्षात आपल्याला मिळालेल्या पत्रावर या दोघांच्याही स्वाक्षर्या नाहीत. कोणताही गैरसमज राहू नये यासाठी या पत्रावर या दोघांच्या स्वाक्षर्या किंवा काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी स्वाक्षरी केली पाहिजे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार आणि प्रकाश आंबेडकर यांच्यातील मतभेद सर्वश्रुत आहेत, पण मतविभागणी टाळण्यासाठी राष्ट्रवादीने वंचित आघाडीला सोबत घेण्याची तयारी दर्शवली आहे. काँग्रेसच्या दृष्टीने वंचित बहुजन आघाडीच अडचणीची ठरली आहे. काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला कायम भाजपची 'बी' टीम म्हणून हिणवले आहे. २०१९च्या निवडणुकीनंतर ही टीका अधिकच तीव्र झाली होती. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेवरही प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली होती. २०१९च्याच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये दोन्ही काँग्रेसची आघाडी होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे सुमारे १५ उमेदवार, तर विधानसभा निवडणुकीत ३२ उमेदवार पराभूत झाले.

आताही घोडे अडले आहे ते काँग्रेसच्या पत्रावर. शिवाय केंद्रातील भाजपला हरवण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याने कोणताही अहंम बाळगणार नाही, असे सांगणार्या वंचितने महाविकास आघाडीसमोर आणखी काही अटी ठेवल्या आहेत. त्यांना प्रामुख्याने प्रत्येक पक्षाचा काय अजेंडा आहे? तूर्तास जागावाटपाचे सूत्र काय आहे? किमान समान कार्यक्रम काय असेल हे जाणून घ्यायचे आहे. २ फेब्रुवारीला होणार्या महाविकास आघाडीच्या बैठकीत याबाबतच्या चर्चेवर प्रकाश आंबेडकर यांचा भर असेल. कारण वंचितला नाममात्र सहभाग नकोय. एकूणच वंचितच्या दिव्याच्या प्रकाशात महाविकास आघाडीच्या विजयाची वाट उजळण्याची शक्यता असली तरी काँग्रेस त्यात 'तेल' कोणते ओतणार यावर सर्व अवलंबून आहे.

जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक!

(आंतरराष्ट्रीय पाणथळ-भूमी दिन.)

जागतिक पाणथळ जमीन दिवस हा एक पर्यावरणाशी संबंधित उत्सव आहे, जो १९७१चा आहे, जेव्हा अनेक पर्यावरणवादी पाणथळ प्रदेशांच्या संरक्षण आणि प्रेमाची पुष्टी करण्यासाठी एकत्र आले होते, ज्या जल परिसंस्था आहेत ज्यात वनस्पती जीवन आणि इतर जीव आहेत जे केवळ पाणीच नाही तर पर्यावरणीय आरोग्यास भरपूर प्रमाणात आणतात. शरीरे पण संपूर्ण वातावरण, जागतिक पाणथळ प्रदेश सचिव विभाग मूळचा ग्लैंड, स्वित्झर्लंडचा आहे. कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील इराणी शहर रामसर येथे रामसर अधिवेशनाचा अवलंब दि.२ फेब्रुवारी १९७१ रोजी झाला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा हा मार्गदर्शक संकलित लेख जरूर वाचाच... संपादक.

इराणमधील कॅस्पियन या समुद्राच्या किनाऱ्यावरील रामसर या शहरी पाणथळ प्रदेशाचे महत्त्व या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. पाणथळ प्रदेशांना मानवी जीवनात असलेले स्थान सर्वांना समजावे या हेतूने दर वर्षी २ फेब्रुवारीचा दिवस वेटलँड्स डे साजरा केला जावा, असा निर्णय या परिषदेत घेतला गेला. असा पहिला दिवस १९९७ साली साजरा झाला होता. पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या पाणथळ जमिनी आपल्याला आढळतात. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्सशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो.असा बहु उपयोगी पाणथळ प्रदेशात सद्या आपण भूगर्भातील पाण्याचा भरपूर वापर करतो. या पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात. अनेकदा आपण प्रदूषित पाणी व इतर हानिकारक द्रव्ये अशा प्रदेशात फेकतो खरे; परंतु पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच या घटकांना गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा.कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या घाण पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी हे देखील पाणथळ प्रदेशच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळते. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांनी होणारी किनाऱ्यांची धूप थांबवली जाऊन वादळांपासून होणारे नुकसानही घटते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याची क्रियाही तेथील मॅनग्रुव- खारफुटी प्रकारच्या झुडपांमुळे कमी होते. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यासही हे जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशात मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की इथले महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या-उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते. पक्षी आणि पाणथळ प्रदेशात बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना पाणथळ प्रदेशांतूनच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी- इबिस, चमचा, राेहित - फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आपण काय करू शकतो. दुर्दैवाने आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन ते जतन करून, तिथला कचरा इ.दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वैयक्तिक पातळीवर सुद्धा पाणथळ प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला तरी या दिशेने एक ठोस पाऊल उचलले जाऊ शकते. आपल्या प्रत्येकाच्या खारीच्या वाट्याने पृथ्वीवरची ही महत्त्वाची समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते आणि पर्यावरणाची बूज राखली जाऊ शकते.

जागतिक पाणथळ भूमी दिवस

दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो, जरी तो १९९७पर्यंत साजरा केला जात नव्हता. हा दिवस जगभरातील पाणथळ प्रदेशांचा प्रभाव आणि सकारात्मक उत्पादन अधोरेखित करतो आणि समुदायांना फायद्यासाठी एकत्र आणतो. हा दिवस केवळ लोकांसाठीच नाही तर ग्रहासाठी पाणथळ भूभागाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागतिक जागरूकता वाढवतो. समुदाय रक्षक आणि पर्यावरणप्रेमी सर्वजण या दिवशी एकत्र येऊन निसर्गावरील त्यांचे प्रेम उत्सवाच्या माध्यमातून साजरे करतात, जे केवळ मानवांसाठीच नव्हे, तर जगातील सर्व प्रकारच्या जीवांसाठी पाणथळ प्रदेशांनी काय केले हे ओळखते. कालांतराने मानवी बांधकामामुळे पाणथळ प्रदेशांवर परिणाम करणाऱ्या विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जास्त लोकसंख्या आणि बांधकामामुळे पर्यावरण संवर्धन कमी झाले आहे. अनेक पाणथळ जागा गमावल्या जात आहेत आणि पर्यावरण शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक हरवण्याआधी मानवाने कोंडी ओळखली पाहिजे.

सन १९९८पासून रामसर सचिवालयाने आर्थिक सहाय्यासाठी डॅनोन ग्रुप इन्व्हियन फंड फॉर वॉटर- पॅरिसच्या बाहेरील आणि बार्सिलोना, स्पेनमध्ये स्थापित सह भागीदारी केली आहे. रामसर सचिवालयासाठी ज्याला रामसर कन्व्हेन्शन ऑन वेटलँड्स ऑफ इंटरनॅशनल इम्पॉर्टन्स म्हणूनही ओळखले जाते, विशेषत: वॉटरफॉल हॅबिटॅट म्हणून या आर्थिक सहाय्यान डब्ल्यूडब्ल्यूडी साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या देशांच्या उपक्रमांना समर्थन देण्यासाठी लोगो, पोस्टर्स, फॅक्टशीट्स, हँडआउट्स आणि मार्गदर्शक दस्तऐवजांसह विविध पोहोच सामग्री तयार केली आहे. हे साहित्य जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अधिवेशनाच्या तीन भाषांमध्ये विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे, इंग्रजी, फ्रेंच आणि स्पॅनिश भाषेत. असे म्हटल्याबरोबर सर्व साहित्य इव्हेंट आयोजकांसाठी त्यांच्या स्थानिक भाषा आणि संदर्भांमध्ये सानुकूलित करण्यासाठी आणि त्यांना अनुकूल करण्यासाठी त्यांच्या डिझाइन फाइल्समध्ये देखील उपलब्ध आहेत.सन सचिवालयाला विनंती केल्यावर काही मुद्रित प्रती देशांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

श्रीलंकेत जागतिक पाणथळ प्रदेश दिन साजरा झाला. सन २०१५पासून सुरू होणारी, २ फेब्रुवारीपासून सुरू होणारी महिनाभर चालणारी वेटलँड्स युथ फोटो स्पर्धा तरुणांना लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांना डब्ल्यूडब्ल्यूडीमध्ये सहभागी करून घेण्यासाठी नवीन दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून सादर करण्यात आली. १५ ते २४वयोगटातील लोक एखाद्या विशिष्ट पाणथळ जमिनीचे छायाचित्र घेऊ शकतात आणि ते फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांदरम्यान जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अपलोड करू शकतात. सन १९९७पासून रामसर वेबसाइटने त्यांच्या डब्ल्यूडब्ल्यूडी क्रियाकलापांचे सुमारे १०० देशांतील अहवाल पोस्ट केले आहेत. सन २०१६मध्ये देशांना त्यांच्या क्रियाकलापांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि डब्ल्यूडब्ल्यूडी नंतर अहवाल देणे सुलभ करण्यासाठी कार्यक्रमांचा नकाशा सादर करण्यात आला. आजवरच्या जागतिक पाणथळ प्रदेश दिन थीम- दरवर्षी लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि पाणथळ जमिनीच्या मूल्याविषयी जनजागृती करण्यात मदत करण्यासाठी एक थीम निवडली जाते. देश जागरूकता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात. जसे की; व्याख्याने, परिसंवाद, निसर्ग पदयात्रा, मुलांच्या कला स्पर्धा, संपन्न शर्यती, समुदाय स्वच्छता दिवस, रेडिओ आणि दूरदर्शन मुलाखती, वर्तमानपत्रांना पत्रे, नवीन पाणथळ धोरणे, नवीन रामसर साइट्स आणि राष्ट्रीय स्तरावर नवीन कार्यक्रम समाविष्ट असतात. सन २०२३मध्ये जागतिक पाणथळ दिवसाची थीम ''वेटलँड्स रिस्टोरेशन'' अशी अपेक्षित होती आणि ती ओलसर जमिनीच्या पुनर्संचयनावर आधारित असावी, असे वाटत होते. सन २०२३- आर्द्र प्रदेश पुनर्संचयित करण्याची वेळ आली आहे, सन २०२२- लोक आणि निसर्गासाठी पाणथळ कृती, सन २०२१- ओलसर जमीन आणि पाणी, सन २०२०- पाणथळ प्रदेश आणि जैवविविधता, सन २०१९- पाणथळ प्रदेश आणि हवामान बदल, सन २०१८- शाश्वत शहरी भविष्यासाठी पाणथळ प्रदेश, सन २०१७- आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी पाणथळ जागा, सन २०१६- आमच्या भविष्यासाठी आर्द्र प्रदेश: शाश्वत उपजीविका, सन २०१५- आमच्या भविष्यासाठी वेटलँड्स, सन २०१४ पाणथळ जमीन आणि शेती: वाढीसाठी भागीदार, सन २०१३- पाणथळ जागा पाण्याची काळजी घेतात, सन २०१२- वेटलँड पर्यटन: एक उत्तम अनुभव, सन २०११- पाण्यासाठी जंगले आणि ओलसर जमीन, सन २०१२- आर्द्र प्रदेशांची काळजी घेणे- हवामान बदलाचे उत्तर, सन २००९- अपस्ट्रीम, डाउनस्ट्रीम: वेटलँड्स आपल्या सर्वांना जोडतात, सन २००८- निरोगी पाणथळ प्रदेश, निरोगी लोक, सन २००७- उद्यासाठी मासे? सन २००६- जीविका धोक्यात, सन २००५- वेटलँड विविधतेमध्ये संपत्ती आहे- ते गमावू नका, सन २००४- पर्वतांपासून समुद्रापर्यंत- आमच्यासाठी ओलसर जमीन काम करत आहे, सन २००३- ओलसर जमीन नाही- पाणी नाही, सन २००२- पाणथळ प्रदेश: जलजीवन आणि संस्कृती, सन २००१- एक आर्द्र जग- शोधण्यासारखे जग, सन २०००- आमच्या संघटना आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे पाणथळ प्रदेश दिन साजरे करत आहे, सन १९९९- लोक आणि पाणथळ जमीन- महत्त्वाचा दुवा, सन १९९८- जीवनासाठी पाण्याचे महत्त्व आणि पाणीपुरवठ्यात पाणथळ जमिनीची भूमिका,सन १९९७- डब्ल्यूडब्ल्यूडी प्रथमच साजरा केला, हे विशेष! !! विश्व पाणथळ प्रदेश दिन निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

दै. जनप्रभात
- संकलन व सुलेखन -
श्रीकृष्णदास बापू निरंकारी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

जिलाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले नचिकेता वाटिकेचे लोकार्पण

कुलगुरू व जिलाधिकार्यांनी के वृक्षारोपण

दै. जनप्रभात
वर्धा, /प्रतिनिधी



महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील अज्ञेय संकुल मधील नचिकेता वाटिकेचे लोकार्पण बुधवार ३१ जानेवारी रोजी विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. भीमराय मेत्री यांच्या अध्यक्षतेखाली वर्ध्याचे जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डीले (आय.ए.एस.) यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी नचिकेता वाटिकेत जिल्हाधिकारी श्री कर्डीले आणि कुलगुरू डॉ. मेत्री यांनी वृक्षारोपणही केले. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. धरवेश कठेरिया, मराठी भाषेचे सुप्रसिद्ध कवि बालाजी सुतार, विश्वविद्यालयाचे अधिष्ठातागण, निदेशक, विभागाध्यक्ष, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी कर्डीले यांनी श्रीफळ फोडून वाटिकेच्या नामफलकाचे लोकार्पण केले. विश्वविद्यालयाच्या या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले. परिसर विकास विभागातर्फे विश्वविद्यालय परिवारातील बालकांच्या व सदस्यांच्या शारीरिक विकासासाठी उद्यानात विविध उपकरणे लावण्यात आली आहेत. यावेळी डॉ. जगदीश नारायण तिवारी यांनी मंगलाचरण सादर केले व आद्या सिंह, कनिका कुमारी, दीक्षा कुमारी आणि कबीर कुमार सिंह या मुलांनी जिलाधिकारी, कुलगुरू व कुलसचिव यांना तिलक लावून स्वागत केले. या कार्यक्रमात प्रो. अवधेश कुमार, प्रो. अखिलेश कुमार दुबे, प्रो. बंशीधर पाण्डेय, प्रो. जर्नादन कुमार तिवारी, डॉ. अशोक नाथ त्रिपाठी, डॉ. जयंत उपाध्याय, डॉ. विपीन कुमार पाण्डेय, डॉ. संदीप कुमार वर्मा, डॉ. योगेन्द्र बाबू, डॉ. रूपेश कुमार सिंह, डॉ. प्रमोद जोशी, डॉ. वागीश राज शुक्ल, डॉ. हरीश चंद्र पाण्डेय, डॉ. सूर्य प्रकाश पांडे, डॉ. रणंजय कुमार सिंह, डॉ. प्रदीप, बी.एस. मिरगे, डॉ. अमित विश्वास आणि सुधीर खरकटे यांच्या सह अज्ञेय संकुलचे अधिकारी, कर्मचारी, सदस्य तथा विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात शंभू दत्त सति, कमल शर्मा, तुषार वानखेडे, संगीता मालवीय, शुभम सोनी, विवेक त्रिपाठी, सुमेध वाघमारे, अनिकेत गहुकर, प्रवीण पुनवटकर, किशोर मडवे ,योगेश नाखले, प्रमोद सामलवार यांनी सहयोग दिला.

आदर ..

पुनः छान पेपरलेस
बजेट झाले सादर
नाविन्यपूर्ण प्रयोग
प्रयासाची हो कदर

जसे असे हातपाय
तशी पांघरा चादर
चांगले जे जे केले
करा त्याचा आदर

चुका झाल्या जिथे
मोठे करायचे उदर
प्रमाद घोर असता
खुशाल मस्त भादर

सल्ले सुध्दा द्यावेत
कधी बनूनि फादर
खांद्या लाव खांदा
आपले शेवटी ब्रदर

संयम दोन्ही बाजूंनी
नको फुकाचा गदर
सांभाळा रे समतोल
करायं नका अनादर

साचेबद्ध प्रतिक्रिया
मदारी नाचवे बंदर
नावे ठेवत रहायचे
असो कितीही सुंदर

दै. जनप्रभात
- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..
www.kavyakusum.com

हरवलेल्या मुलाचा विहिरीत सापडला मृतदेह

दै. जनप्रभात
नरखेड/ प्रतिनिधी

नरखेड तालुक्यातील सिंजर येथे एक दुर्दैवी घटना घडली असून हरवलेल्या मुलाचा मृतदेह गावालगतच्या विहिरीत सापडला आहे. दिव्यांशू देवेंद्र भिल्लम वय वर्ष ३ वर्ष ६ महीने रा. सिंजर हा मुलगा बुधवारी सायंकाळी ५ वाजता पासून हरवला होता. गुरवारी सकाळी ९ च्या सुमारास त्या मुलाचा मृतदेह गावालगतच्या शेतातील विहिरीत आढळून आला.

देवेंद्र वामनराव भिल्लम वय ३७ वर्ष रा. सिंजर यांचा चुलत भाऊ कैलास भिल्लम यांच्याकडे कार्यक्रम सुरू होता. दिव्यांशु रडत रडत आपल्या बहिणींच्या मागे कार्यक्रमाला जाण्यात सायंकाळी ५ च्या सुमारास जात होता. मुलाचे वडील सायंकाळी ६ शेतातून घरी परत आले असता आईला मुलांविषयी विचारले असता मुलगा कार्यक्रमात गेला असल्याचे आईने सांगितले. मुलाचे वडील मुलाला पाहायला चुलत भाऊ कैलास भिल्लम यांच्याकडे गेले असता मुलगा दिव्यांशू भिल्लम तिथे मिळाला नाही. मुलाचा आजूबाजूला, शेतशिवारात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता, मिळून आला नाही. लगेच मुलाच्या वडिलांनी जलालखेडा पोलिस स्टेशन गाठले व मुलगा हरवला असल्याची तक्रार नोंदवली. दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी कलम ३६३ भादवी नुसार गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनास्थळी जावून मुलाचा शोध घ्यायला सुरवात केली. पण मुलगा मिळाला नाही. लगेच पोलिसांनी या घटनेची माहिती वरिष्ठांना दिली असता घटनास्थळी पोलिस उपविभागीय अधिकारी काटोल बापू रोहम, नरखेड येथील ठाणेदार कृष्णा तिवारी, पोलिस उपनिरीक्षक मनोज शेंडे, पोलिस कर्मचारी, डॉग स्कॉड व नागपूर येथील पोलिस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहचले व मुलाचा शोध घ्यायला सुरवात केली परंतु रातभर मुलाचा शोध लागला नाही. मुलाच्या अंगात लाल कलरची काळी पट्टी असलेले टी-शर्ट, काळ्या कलरची हाफ पॅन्ट घालून होता. गुरवारी सकाळी शेतकरी आपल्या शेतात गेला असता त्याला विहिरीत मुलाचा मृतदेह दिसून आला त्याने याबाबत गावकऱ्यांना माहिती दिली तसेच लगेच याबाबत पोलिसांना माहिती दिली असता पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मुलाचा मृतदेह विहरी बाहेर काढला व उत्तरीय तपासणी साठी शव विच्छेदन गृहात पाठवलं. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास जलालखेडा पोलिस करत आहे.



श्रद्धांजली नव्हे तर चर्चा सत्रासाठी मागितली परवानगी, विश्वविद्यालयाने दिला स्पष्ट नकार

दै. जनप्रभात
वर्धा, /प्रतिनिधी

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात ३० जानेवारी रोजी गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त विश्वविद्यालयाने गांधी हिल्सवर सकाळी ११:०० वाजता पुष्पांजली, प्रार्थना आणि मौन सभा आयोजित करून गांधीजींना शहीद दिनानिमित्त अभिवादन केले. कुलसचिव कार्यालयाने जारी केलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितही होते. सदर कार्यक्रमाला उपस्थित न राहता काही विद्यार्थ्यांनी २९ जानेवारी रोजी कुलसचिवांना सायंकाळी ६ वाजता चर्चा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत पत्र दिले होते. विश्वविद्यालय प्रशासनाने यापूर्वीच शहीद दिनानिमित्त सकाळी ११ वाजता श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि संध्याकाळी ०६:०० वाजता सूर्यास्तानंतर श्रद्धांजली वाहण्याचे कोणतेही औचित्य नव्हते. विद्यार्थ्यांच्या पत्रावर कुलसचिवांनी 'विश्वविद्यालयाच्या कार्यक्रमात सहभागी व्हा' असे लिहून निमंत्रित केले होते. मात्र कार्यक्रमाच्या गांभीर्याकडे दुर्लक्ष करून काही विद्यार्थी परवानगी नसतानाही गांधी हिल्स येथे जमले. विश्वविद्यालय प्रशासनाचे म्हणणे आहे की, विद्यार्थी गांधी हिल्सवरील महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ कोणताही चर्चा कार्यक्रम न करता इतरत्र गांधीजींचा छोटासा फोटो लावला व तेथे जमा झाले. या कृतीमुळे विश्वविद्यालयाची प्रतिमा मलिन होत असून त्या विद्यार्थ्यांच्या हेतूवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जर विद्यार्थ्यांनी सकाळी ११:०० च्या कार्यक्रमाला हजेरी लावली असती, तर त्यांना संध्याकाळी ०६:०० च्या कार्यक्रमासाठी वेगळी परवानगीची आवश्यकता नव्हती. विश्वविद्यालयात गांधीजींना आदरांजली वाहण्यावर कोणतेही बंधन नव्हते. विद्यार्थ्यांनी विश्वविद्यालयाच्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवून संध्याकाळी सभा आयोजित करण्यामागे काय हेतू होता? साधारणत: दिवसभरातच श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्याची प्रथा आहे. त्याकडे दुर्लक्ष करून ०६:०० वाजता सभा आयोजित करण्यात आली होती.

छत्रपती संभाजीनगरमधील सात पोलीस निरीक्षकांच्या विदर्भात बदल्या

दैनिक जनप्रभात
प्रतिनिधी मोहन आखाडे
छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

चार वर्षापासून शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत कार्यरत असलेल्या सात पोलीस निरीक्षकांच्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी रात्री विदर्भातील नागपूर, गडचिरोली आणि अमरावती येथे बदल्या करण्यात आल्या. यात पाच निरीक्षकांची बदली नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात झाली आहे.राज्यातील विविध ठिकाणाहून पाच पोलीस निरीक्षक शहरात बदलून आले आहेत. बदली झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आणि कंसात बदलीचे ठिकाण. क्रांतीचौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील (नागपूर शहर), छावणी वाहतूक शाखेच्या निरीक्षक राजश्री आडे (नागपूर शहर), हर्सूल पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रशांत पोतदार (नागपूर शहर), वाहतूक शाखेचे निरीक्षक कैलाश देशमाने (नागपूर शहर), विशेष शाखेचे निरीक्षक अशोक भंडारे (नागपूर शहर), दौलताबाद पोलीस ठाण्याचे निरीक्षक विनोद सलगरकर (गडचिरोली), पोलीस नियंत्रण कक्षातील निरीक्षक हनुमंत गिरमे (अमरावती शहर) या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. चार पोलीस निरीक्षक शहरात...पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे व पोलीस निरीक्षक शुभांगी देशमुख, (नागपूर शहर पोलीस आयुक्तालय), पोलीस निरीक्षक अनिल देवढे (पिंपरी चिंचवड), रेखा लोंढे (अमरावती) आणि कुमारसिंग राठोड हे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातून बदलून येत आहे.

चष्मा ..

चष्मिशांची असे
समान एक व्यथा
मिळत नाहीचष्मा
हरिदासाची कथा

ऐन वेळी हरवतो
बडवू लागा माथा
कपाळावरी चष्मा
सर्वत्र करतो पृथा

आबाल वृद्ध सर्वां
चष्मा जसा देवता
मोद ना मावे नभी
चष्मावेळी धावता

घाईचे वेळी गायब
चष्म्याची ही प्रथा
पाय फुटे चष्म्याला
कोण आवरेल रथा

चष्म्याचा वरचष्मा
आवडे तो विधाता
चष्मा सापडून देता
सर्वोच्चस्थानी दाता

सेंसर हवा एखादा
चष्म्यासाठी आता
मागेल तसा मिळेलं
जागेवर योग्य यथा

दै. जनप्रभात
- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.
www.kavyakusum.com

पूर्णा येथील बुद्ध विहाराला निधी देण्याचे आश्वासन

पालकमंत्री संजय बनसोडे यांचे प्रतिपादन





दै, जनप्रभात
परभणी /अरविंद कांबळे

पूर्णा, येथे २१ वी धम्म परिषद निमित्त पालकमंत्री संजय बनसोडे आले असता बुद्ध विहार विकास कामासाठी सुविधा देण्यासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले. पूर्णा येथील भदंत थेरो नगर परिसरातील सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या इमारतीचे लोकार्पण आणि अजिंठा कमानीचे उद्घाटन कार्यक्रमात पालकमंत्री संजय बनसोडे बोलत होते. यावेळी मंचावर आमदार डॉ, रत्नाकर गुट्टे, गीता गुट्टे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे ,पोलीस अधीक्षक रागसुधा आर उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, डॉ,प्रताप काळे, भदंत डॉ,उपगुप्त महाथेरो,भिकू करुणानंद महाथेरो डॉ, ली ची रॅन, राजेश विटेकर तसेच आजी-माजी नगरसेवक उपासक उपासिका आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री म्हणाले की पूर्णा येथील बुद्ध विहार हे संस्कार केंद्र आहे . त्यानिमित्त विहाराच्या विकास कामासाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. बुद्ध विहारांमध्ये आल्याच्या नंतर कोणताही व्यक्ती असो त्यामध्ये एक नवीन ऊर्जा प्राप्त होते असेही म्हणाले. पूर्णा येथे मागील अनेक वर्षापासून विहारांमध्ये विविध कार्यक्रम होत असतात. २१ वी बौद्ध धम्म परिषद ही धम्म प्रचार प्रसार करत आहे. या बुद्ध धम्म परिषदेचे आयोजन नियोजन भदंत डॉ,उपगुप्त महाथेरो यांच्या माध्यमातून होते .बुद्ध विहाराच्या विकासासाठी आज ज्या काही मागण्या करण्यात आल्या आहेत त्याबाबत तात्काळ पाठपुरावा करून निधी लवकरात लवकर मिळवून देण्याचे आश्वासन दिले. या दोन दिवसीय बुद्ध धम्म परिषदेला असंख्य जनसमुदाय दिसून आला.

पूर्णा येथील बुद्ध विहाराला निधी देण्याचे आश्वासन पालकमंत्री संजय बनसोडे यांचे प्रतिपादन

दै, जनप्रभात परभणी अरविंद कांबळे

पूर्णा, येथे २१ वी धम्म परिषद निमित्त पालकमंत्री संजय बनसोडे आले असता बुद्ध विहार विकास कामासाठी सुविधा देण्यासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले. पूर्णा येथील भदंत थेरो नगर परिसरातील सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या इमारतीचे लोकार्पण आणि अजिंठा कमानीचे उद्घाटन कार्यक्रमात पालकमंत्री संजय बनसोडे बोलत होते. यावेळी मंचावर आमदार डॉ, रत्नाकर गुट्टे, गीता गुट्टे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे ,पोलीस अधीक्षक रागसुधा आर उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, डॉ,प्रताप काळे, भदंत डॉ,उपगुप्त महाथेरो,भिकू करुणानंद महाथेरो डॉ, ली ची रॅन, राजेश विटेकर तसेच आजी-माजी नगरसेवक उपासक उपासिका आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री म्हणाले की पूर्णा येथील बुद्ध विहार हे संस्कार केंद्र आहे . त्यानिमित्त विहाराच्या विकास कामासाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. बुद्ध विहारांमध्ये आल्याच्या नंतर कोणताही व्यक्ती असो त्यामध्ये एक नवीन ऊर्जा प्राप्त होते असेही म्हणाले. पूर्णा येथे मागील अनेक वर्षापासून विहारांमध्ये विविध कार्यक्रम होत असतात. २१ वी बौद्ध धम्म परिषद ही धम्म प्रचार प्रसार करत आहे. या बुद्ध धम्म परिषदेचे आयोजन नियोजन भदंत डॉ,उपगुप्त महाथेरो यांच्या माध्यमातून होते .बुद्ध विहाराच्या विकासासाठी आज ज्या काही मागण्या करण्यात आल्या आहेत त्याबाबत तात्काळ पाठपुरावा करून निधी लवकरात लवकर मिळवून देण्याचे आश्वासन दिले. या दोन दिवसीय बुद्ध धम्म परिषदेला असंख्य जनसमुदाय दिसून आला.



विरुळ येथे विहिरीत मृतदेह सापडला

दै. जनप्रभात
विरुळ आकाजी/ प्रतिनिधी



विहिरीतील पाण्यात बुडून इसमाचा मृत्यू झाला ही घटना नागझरी शिवारात घडली ३१ जानेवारीला पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली संजय अण्णाजी बुराडे वय ४५ रा विरुळ असे मृताचे नाव आहे संजय हा सकाळ पासून नागझरी शिवारात शेतात गेला होता तो दुपारपर्यंत घरी न आल्याने त्याचा शोध घेतला असता तो गजानन तुरके यांच्या विहिरीजवळ चप्पल, कपडे दिसल्याने विहिरीत पाहता त्याचा मृतदेह पाण्यात दिसला लगेच पोलिस पाटील यांना घटनेची माहिती दिली त्यांनी पुलगाव पोलिसांना ह्या घटनेची माहिती देताच पुलगाव पोलीस स्टेशन चे पी. एस. आय. सदानंद वरडकर व कर्मचारी घटनास्थळी येऊन प्राथमिक पंचनामा केला नंतर शवविच्छेदनासाठी पुलगाव च्या सरकारी दवाखान्यात नेण्यात आले पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहे

अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेकडून पुरवठा विभागाला निवेदन

कार्यवाही नाही झाल्यास तीव्र आंदोलनाचा ईशारा



दै. जनप्रभात
नवनाथ डिगोळे/प्रतिनिधी

आज दि १ फेब्रुवारी २०२४ वार गुरवार रोजी अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटना कडुन अन्न पुरवठा विभागाकडून धान्य वितरण करणाऱ्या शासन मान्य रास्त भाव दुकानदारांकडून शिधापत्रिका धारकला येणाऱ्या धान्य शासनाच्या आदेशानुसार ठरून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी व काही शिधापत्रिका धारकांना तर ते धान्य न देता त्या धान्याची कळ्या बाजारात विक्री करुण गोर गरीब लोकांच्या तोंडचा घास काढून घेण्याचे काम दुकानदार व पुरवठा अधिकारी यांच्याकडून होत आहे त्यासंदर्भात संघटने कडून सदरील प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व अश्या अधिकारी व दुकानदारावर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली कार्यवाही जर झाली नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला यावेळी अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष कृष्णा धोंडगे विष्णु फरकांडे वैभव धोंडगे शिवकुमार मामडे किर्तेश्र्वर नीलंगे आदी उपस्थित होते.

इंदापूर तालुक्यामध्ये सर्वत्र मराठी भाषेमध्ये दुकांनावरती पाटया लावा , अन्यथा सुराज्य निर्माण सेनेचे आंदोलन

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित



इंदापूर:- सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून इंदापूर तहसिल कार्यालय येथे सुराज्य निर्माण सेनेचे युवक अध्यक्ष युवक अध्यक्ष विष्णू सोनवले यांनी दिले तहसिल कार्यालयाला लेखी निवेदन दिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की ,मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे व सर्व संस्था , दुकाने , आस्थापनांना मराठी भाषेत पाटया लावणे व व्यवहार करणे हे दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार बंधनकारक असून सुध्दा मराठी भाषेमध्ये दुकान, संस्था, आस्थापना च्या पाट्या मराठीतून दिसत नाहीत तरी इंदापूर तालुक्यातील सर्व महसुली गावामध्ये मराठी भाषेमध्ये पाटया त्वरित लावण्या संदर्भात कारवाई करण्यात यावी तसेच प्रशासनास दि.१ मार्च २०२४ पर्यत मुदत देण्यात येत आहे तरी आपल्या तलाठी कार्यालयाकडून गावांमध्ये किती मराठी भाषेमध्ये पाटया आहेत व इंग्रजी व इतर भाषेमध्ये किती दुकाने आस्थापनांना पाटया आहेत यांचा अहवाल सुराज्य निर्माण सेनेला दिलेल्या मुदतीत मिळावा ,अन्यथा सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून आंदोलन करणार असल्याचे माहिती सुराज्य निर्माण सेना युवक आघाडी इंदापूर अध्यक्ष विष्णू सोनवले यांनी पत्रकारांना दिली. यावेळी सत्यशोधक बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष राहूल लोखंडे ,दत्तात्रेय वाघमोडे व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



रेणकापूर पुला जवळचा खड्डा दुरुस्ती साठी नागरिकांनी किती करायच्या ओवाळण्या

दै. जनप्रभात
समुद्रपुर/प्रतिनिधी



हिंगणघाट उमरेड राज्य मार्गावरील समुद्रपूर ते जाम रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून दुचाकी व चारचाकी वाहने चालविणे कठीण झाले असताना कोटी च्या कोटी रुपयांची विकासाच्या वरंगा करणारे नेते व निगरगठ्ठ सार्वजनिक बांधकाम अधिकारी याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याने हा कसला विकास झाला असा प्रश्न नागरिकांना पडला आहे .तर दुसरीकडे एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा सार्वजनिक बांधकाम विभाग करीत तर नाही ना? असा प्रश्न वाहन चालकांच्या मनात उत्पन्न होत आहे. एखादा मोठा अपघात घडल्यावरच नेहमीप्रमाणे जनतेचे कनवाळू नेते व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग येण्याची वाट पाहिल्या जात आहे का असा प्रश्न वाहन चालकांना पडला आहे .चार महिन्यापूर्वी दैनिक जनप्रभात वृत्त प्रकाशित होताच खड्ड्यामध्ये कांही ठिकाणी मुरुम तर कांही ठिकाणी डांबर मिश्रीत गिटी टाकण्यात आली होती पण त्यावर योग्य प्रकारे रोलर न फिरवल्याने रोडची जैसे थे परिस्थिती दिसून येत आहे.विशेष म्हणजे चार महिन्यापुर्वी डांबर गरम करण्यासाठी आणलेला ड्रम अजुनही त्याच जागेवर तसाच पडून आहे यावरूनच सार्वजनिक बांधकाम विभाग किती तत्पर आहे हे दिसूनच येते. संबधित अधिकाऱ्याने जाम समुद्रपूर रस्ता पुर्णपणे खड्याचा करावा नाही तर तो दुरुस्त करावा असाच प्रश्न वाहन चालकांच्या मनात येत आहे.विशेष म्हणजे याच रोडवरून समुद्रपूर तालुक्यातील सर्व कार्यालयातील लहान-मोठे अधिकारी व सर्व पक्षांचे लहान-मोठे नेते रोज ये-जा करताना दिसतात पण कोणत्याही विभागाच्या अधिकाऱ्यांची किंवा कर्मचाऱ्यांनी रोडच्या खड्या बाबत चकार शब्द उच्चारत नाहीत. तसेच सत्ताधारी नेते विरोधी नेते ही चकार शब्द उच्चारत नाहीत.हे भारता सारख्या लोकशाहीच्या देशातील मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.आहो पुन्हा रोडवर नव्याने खड्डे निर्माण झाल्याची परिस्थिती कधी यांना दिसली नसेल का? कुंभकर्णी झोपेत असलेल्या अधिकाऱ्यांना एखाद्याचा जीव गमावून बसल्यावर तर जाग येणार आहे काय? असच वाटत आहे. गावातील सिमेंट रस्त्यावर गतिरोधक लावण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग दोन वर्षांनी आली. त्याप्रमाणे रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी किती वर्षे लागतील असा प्रश्न वाहन चालकांच्या मनात उत्पन्न होत आहे. तरी कर्तव्य दक्ष नेत्यांनी या रस्त्याबाबत त्वरित दखल घेऊन रस्ता दुरुस्ती करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात यावे अशी मागणी वाहन चालक करीत आहेत. मार्गावरील समुद्रपूर ते जामच्या मधामध्ये रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून या खड्ड्यामुळे रोज लहान मोठे अपघात होत आहेत मात्र याकडे संबंधित विभागाचे इंजिनीयर त्या वेळेस करतात तरी काय असाच प्रश्न उपस्थित होत आहे.



नागपूर शहरातील केशवनगर कलमना युनिटी इंग्लिश अप्पर प्रायमरी स्कूल व माँ भवानी हिंदी उच्च प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जानेवारी ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा



दै. जनप्रभात
नागपुर /प्रतिनिधी

कार्यक्रमात लाभलेले प्रमुख पाहुणे मा. शेषरावजी गोतमारे (नगरसेवक, कलमना, यशवंतरावजी बुटके (डायरेक्टर ऑफ युनिटी इंग्लिश चुटके (डायरेक्टर ऑफ युनिटी इंग्लिश अप्पर प्रायमरी स्कुल तसेच मा. अरिवंदजी बुटके सर संचालक ऑफ माँ भवानी हिंदी प्राथमिक स्कुल, प्रमुख पाहुने मा. ओम इश्वरकर सर सौ. मंजुषा ठाकूर मोहारीया मॅम मुख्याध्यापक युनिटी इंग्लिश अप्पर प्रायमरी स्कुल, सौ. मोनिका मिश्रा तिवारी मैम, इंन्चार्ज ऑफ प्री प्रायमरी स्कुल यांच्या उपिस्थतीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम माँ सरस्वती मोतेच्या प्रतिमेला पुष्पहार व नपमन केले तसेच संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेच आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व नमन करुन सरस्वती वंदना केली, व ध्वजारोहनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमांतर्गत विद्याथ्यांनी डोल तोचे घेवुन आनंदाने भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमात विद्याच्यांनी विविध नाट्यछटा, भाषणे, देशभक्ती गीते तसेच कवायती सादर केली, तीरंगी रंगाचे दुपट्टे घेवून मयुन नृत्य सादर करण्यात आले. तसेच वर्ग ५ ते ८ च्या मुलांनी पिरॅमीड डरा राष्ट्रध्वज नृत्य सादर केले. शाळेतील विद्यार्थी कक्षा ८ वी करण महेश शाहु या विद्याथ्याने देशभक्ती गीत तसेच भक्ती गीत (मेरे घर राम आये है) गीत सुस्वरात गायले, विविध प्रकारची नृत्य भाषण गीत यांच्या डरे प्रजासत्ताक दिन उत्साहाणे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला लाभलेले पाहुणे मा. गोतमारे सर यांनी वद्यार्थाना २६ जानेवारी ७८ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा तसेच माहीती दिली. शाळेतील मुख्याध्यापक सर मा. यशवंतजी बुटके यांनी वद्याथ्यांना तसेच सर्व शिक्षगण यांना शुभेच्छा दिल्या व माहीती देवून शाळ अंतर्गत संपन्न झालेल्या वार्षिक स्नेहसम्मेलनाच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या पालकगण तसेच विद्यार्थी शिक्षकवृंद यो आभार व्यक्त केले, मुख्याध्यापिका श्रीमती मंजुषा मोहारीया मॅम युनिटी अप्पर प्रायमरी स्कुल कार्यक्रमाला लाभलेल्या पाहुंच्या अभिनंदन केले व पालकेणांचे स्वागत करण्यात आले मुलांना पालकांच्या हस्ते मेडल तसेच पमाणपत्र देण्यात आले विशेष कौशल्य सादर करण्या-या मुलांना मुख्याध्यापक सर व प्रमुख पाहुण्यांनी प्रमाणपत्र देवून त्यांना प्रोत्याहीत करण्यात आले. विद्याथ्यां स्विट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी खुशी शाहू मैम यांनी केले. तसेच कार्यक्रमात उपस्थित पाहुणे पालकगण व विद्यथ्यांचे आभार प्रदर्शन कुमारी, हेमलता भंडारकर मॅम यांनी केले, कार्यक्रमात उपस्थित असलेले शिक्षकवृंद्र सौ. रेखा गोहणे, मैम, कुमारी सिमरन ठाकूर मॅम, सो. ज्योती ज्योती पारधी, मॅम, सी. रुपाली लोडेकर मॅम, कु. निर्मल शाहु मैम, सौ. कौशल्या सरकाम मॅम, कुमारी सिमा शाहु मॅम, रोशनी खोब्रागडे मॅम यानी ७५ वा प्रजासत्ताक दिन सोहळा आनंदाने पार पाडला,

विमुक्त जाती व भटक्या जमातींना आता मोदी आवास घरकुल योजनेचा लाभ मिळणार

मंत्री संजय राठोड यांची मागणी मान्य ; शासन निर्णय निर्गमित

दै. जनप्रभात
मुंबई / प्रतिनिधी

राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासोबतच विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांचा समावेश 'मोदी आवास' घरकुल योजनेमध्ये करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांना इतर मागास प्रवर्गाप्रमाणेच मोदी आवास घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता. तसेच मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर चर्चा केली होती. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यभरातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना घरकुल मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. यापूर्वी २८ जुलै २०२३ रोजी जारी करण्यात आलेल्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शासन निर्णयातील नमूद अटी व शर्ती विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनाही लागू राहतील. या योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अशी अट या नव्या शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे. शासन निर्णयामुळे आता राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न साकार होईल. या महत्त्वाकांक्षी निर्णयाबद्दल मंत्री श्री. राठोड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांचे आभार मानले आहेत.

पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात 'परीक्षा पे चर्चा 'कार्यक्रमाचे आयोजन

दै. जनप्रभात / प्रतिनिधी



पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात परीक्षा पे चर्चा या विषयावर व्याख्यान : कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान पर्यवेक्षक प्राध्यापक विश्वनाथ वंजारी सर यांनी भूषवले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक मेश्राम सर होते प्राध्यापक मेश्राम सरांनी परीक्षा पे चर्चा या विषयावर मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी परीक्षा पे चर्चा वर ''नमो ॲप'' डाऊनलोड करायला सांगितला व ह्या ॲप वरती रजिस्ट्रेशन कसं करायचं ते सर्व शिक्षकांना व मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष करून दाखवले व सर्वांचे रजिस्ट्रेशन व्यवस्थित पणे करून दिले. यामध्ये ३०० शब्दांपर्यंत माहिती लिहायची आहे. विद्यार्थ्यांच्या मनात परीक्षेविषयीची जी भीती आहे ती कशी दूर करता येईल याविषयी लिहायचं आहे व ही सर्व माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत ह्या ॲपडरे पोहोचणार आहे व उत्कृष्ट लिखाणाला चांगलं पारितोषिक सुद्धा मिळणार आहे. जे जे यामध्ये माहिती पाठवणार आहेत त्यांना सर्टिफिकेट मिळणार आहे व पोस्टाने घरपोच सुद्धा सर्टिफिकेट येणार आहे. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक ललित मासुरकर सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राध्यापक आशिष वरटकर सर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त पत्रकार गीतांजली लव्हाळे यांच्यावर जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव

दै,जनप्रभात
उपसंपादक /राठोड रमेश पंडित

==========

बीड:- दैनिक जनप्रभात च्या बीड प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्या पत्रकार गीतांजली लव्हाळे- वानखेडे यांचा वाढदिवस वडवणी शहरातील मराठी पत्रकार परिषदेचे ऑफिस साळींबा रोड येथे मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरीब महिलांना साड्याचे व बिस्किट पुड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थित डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष संपादक अनिल वाघमारे, एपीआय अमन शिरसट, सोमेश्वर सोनटक्के, मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष विनायकराव जाधव, माजी अध्यक्ष सुधाकर पोटभरे ,दिपक ऊजगरे, भालेराव मित्र मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे,ॲड.भास्कर ऊजगरे, पत्रकार सतीश मुजमुले,पत्रकार गीतांजली लव्हाळे, पोलीस पाटील आश्रुबा सोनवणे, पत्रकार महेश सदरे, पत्रकार सतीश सोनवणे,पत्रकार शेख एजाज, पत्रकार आर्जुन मुंडे, बळीराम ऊजगरे, गवळी,फोटो ग्राफर आतुल काळे,शेख वाजेद यांच्यासह समाजातील गरीब महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सविस्तर वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील पहिल्या महिला पत्रकार गीतांजली लव्हाळे यांचा वाढदिवस वडवणी शहरातील मराठी पत्रकार परिषदेचे ऑफिस साळींबा रोड येथे मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी वडवणी पोलीस स्टेशनचे एपीआय अमन शिरसाट यांची खास प्रमुख उपस्थिती होती. त्याचबरोबर डिजिटल मीडियाचे राज्याध्यक्ष संपादक अनिल वाघमारे व त्यांची संपूर्ण टीम या वाढदिवसाला आवर्जून उपस्थित होते. या मान्यवरांनी सर्वांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गरीब महिलांना साड्याचे वाटप करून बिस्कीट पुढेही वाटप करण्यात आले. यामुळे वडवणीतच नव्हे तर पूर्ण जिल्हाभरातून पत्रकार गीतांजली लव्हाळे यांच्यावर वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छांचा वर्षाव झाला. पत्रकारितेबरोबरच सामाजिक कार्यामध्ये सुद्धा पत्रकार गीतांजली लव्हाळे यांचा हातखंडा आहे. त्यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे अगदी कमी दिवसांमध्ये वडवणी तालुक्यात त्यांच्या नावाचा गवगवा होत गेला. कुठल्याही कार्यक्रमांमध्ये स्वतः उपस्थित राहून अपडेट घेणे हेच त्यांच्या या वाढदिवसाच्या शुभेच्छा वरून लक्षात येते. परिषदेच्या सर्व सदस्यांनी व एपीआय अमन शिरसाट आणि राज्य अध्यक्ष संपादक अनिल वाघमारे या सर्वांनी मिळून पत्रकार गीतांजली लव्हाळे यांचा मोठा सत्कार केला व त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा ही दिल्या. पत्रकार गीतांजली लव्हाळे यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे समाजामध्ये पत्रकाराबद्दल वेगळा संदेश जाईल असे संपादक अनिल वाघमारे यांनी सांगितले. एपीआय अमन शिरसाट यांचा देखील परिषदेच्या वतीने ऑफिसमध्ये भव्य सत्कार करण्यात आला. पुढे भविष्यामध्येही पत्रकारितेबरोबरच सामाजिक उपक्रम सुद्धा राबवणार असे मत पत्रकार गीतांजली लव्हाळे वानखेडे यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.













































महाविकास आघाडीत तिढा

४० जागांवर एकमत, ८ जागांचा घोळ संपेना

राजा माने/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांत हालचालींना वेग आला असून, महाविकास आघाडीत बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. त्यामुळे जागावाटपावरून आघाडीत कसलेही मतभेद नसल्याचे बोलले जात असले तरी हळूहळू मतभेद समोर येताना दिसत आहेत. महाविकास आघाडीत लोकसभेच्या एकूण ४८ पैकी ४० जागांवर मतैक्य झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, ८ जागांवरून तिन्ही पक्षांत मतभेद असल्याचे बोलले जात आहे.

विशेषतः शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसमध्येच वाटाघाटी सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यातच वंचित आघाडी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना हेही महाविकास आघाडीत येण्याची शक्यता लक्षात घेऊन या दोन्ही पक्षांना शिवसेनेच्या वाट्यातील जागा देण्याचे ठरल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे एक-एक जागेवर वंचित आघाडी आणि स्वाभिमानीचे समाधान होणार का, हाही प्रश्न आहे.

महाविकास आघाडीची मंगळवारी मुंबईत बैठक झाली. या बैठकीत वंचित आघाडी महाविकास आघाडीत सामिल झाल्याचे जाहीर करण्यात आले असून, खा. संजय राऊत यांनी महाविकास आघाडीचा विस्तार झाल्याचा दावा केला. विशेष म्हणजे महाविकास आघाडीत जागावाटपावरून कुठलेही मतभेद नसल्याचे सांगण्यात आले. मात्र, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महाविकास आघाडीत ४८ पैकी ४० जागांवर मतैक्य झाले आहे. मात्र, ८ जागांवरून मतभेद आहेत. आता या ८ जागांचा तिढा राज्य पातळीवरच सोडवण्याचे महाविकास आघाडीतील नेत्यांचे प्रयत्न आहेत.



अद्याप आघाडीत नाही : आंबेडकर

वंचित आघाडीचा अद्याप महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही. मंगळवारच्या बैठकीत काय ठरले, याची माहिती मागितली आहे. अद्याप महाविकास आघाडीत जागा वाटपाचे सूत्र ठरलेले नाही. आम्ही दोन पावले मागे येण्यास तयार आहोत. परंतु, आम्हाला दिलेल्या पत्रात फक्त काँग्रेसच्या नाना पटोले यांचीच स्वाक्षरी आहे. अशोक चव्हाण आणि बाळासाहेब थोरात यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे आम्ही अजून महाविकास आघाडीत सामिल झालेलो नाही, असे वंचित आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी स्पष्ट केले.

या जागांवरून मतभेद

महाविकास आघाडीत ४८ पैकी ८ जागांवर तिढा आहे. यामध्ये रामटेक, हिंगोली, वर्धा, भिवंडी, जालना आणि शिर्डी यासोबतच दक्षिण-मध्य मुंबई, उत्तर-पश्चिम मुंबई यावरही काँग्रेस पक्ष दावा करत आहे. मात्र, मुंबईतील दोन्ही जागांवर शिवसेनेचा विजय झालेला आहे. त्यामुळे शिवसेना मुंबईच्या जागा सोडण्यास तयार नाही. तसेच शिर्डी, रामटेक, जालन्याची जागाही शिवसेना सोडण्याची चिन्हे नाहीत. त्यामुळे काँग्रेस नेते यात कशी तडजोड घडवून आणू शकतात, यावर पुढील काही दिवसांत चित्र स्पष्ट होऊ शकते.

आता यासंदर्भात २ फेब्रुवारी रोजी पुन्हा महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत काही जागांवरून समोर आलेले मतभेद मार्गी लावण्याचा सर्वच नेत्यांचा प्रयत्न राहणार असल्याचे बोलले जात आहे.

भुजबळांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा!

शिवसेना आमदारांची जाहीर भूमिका

मुंबई : ओबीसींसाठी आक्रमक भूमिका घेणाऱ्या छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट आणि शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी सरकारकडे केली आहे. आरक्षणावर राजकारण करणाऱ्यांनी सरकारमधून बाहेर पडावे, असा टोला या दोघांनी भुजबळ यांना लगावला आहे.

आमदार संजय गायकवाड म्हणाले, ''मंत्रिमंडळ सदस्य असतानाही छगन भुजबळ हे वारंवार तिरस्काराची भूमिका घेत आहेत, हा तिरस्कार बरा नाही. अशा मंत्र्यास मंत्रिमंडळात ठेवायला नको, त्यांना बाहेर काढायला हवे. त्यांना मंत्रिमंडळातून काढायचे का नाही हा सर्वस्वी अजित पवार यांचा निर्णय आहे. एका मंत्र्यांच्या विरोधाने आमच्या सरकाला काहीच फरक पडत नाही, हे मी खुलेआम सांगतो. मंत्रिपदाची शपथ घेताना राज्यातील सर्व जनतेच्या हिताच्या गोष्टी करतात आणि आता एका समाजाचा तिरस्कार करतात, हे चुकीचे आहे. गेली ७० वर्षे तुम्ही या समाजाच्या नोंदी काढल्या नाहीत, तो समाज म्हणून सोयीपासून वंचित राहिला. आता त्यांचे प्रमाणपत्र सापडले तर कुणाचा बाप त्यांना प्रमाणपत्र देण्यापासून रोखू शकत नाही, असा इशाराही त्यांनी भुजबळांना दिला आहे.

शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, संजय गायकवाड यांनी केलेले वक्तव्य हे वैयक्तिक जरी असले तरी मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण हे दोन वेगवेगळे विषय आहेत. आम्ही ओबीसी समाजाचे नेते आहोत, अशी भूमिका घेऊन ते राजकारण करत आहेत. यामुळे दोन्ही समाजामध्ये वाईट संदेश जात आहे. माध्यमांसमोर जाऊन सरकार चुकते असे तुम्ही म्हणत असाल तर ते योग्य नाही. मग त्यांचा राजीनामा मागितला तर त्यात काही गैर नाही, असे म्हणत शिरसाट यांनी संजय गायकवाड यांची पाठराखण केली.

...तर त्यांना त्यांचा निर्णय घेऊ द्या

''काही लोकांचा मराठा समाजावर रोष असेल तर त्यांनी राजकीय जोडे बाजूला ठेवावेत. कुणी कुणाला काढले पाहिजे, कुणी कुणाला ठेवले पाहिजे, यापेक्षा स्वाभिमानाने सर्व गोष्टी सोडत जनतेमध्ये गेले पाहिजे आणि आपली भूमिका मांडायला हवी. सरकारमध्ये असताना आपली भूमिका कॅबिनेटमध्ये मांडली पाहिजे. मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करत यावर निर्णय घ्यायला हवा. त्यांनी ऐकले नाही तर तुम्ही तुमचा निर्णय घ्यायला मोकळे आहात, असे शिरसाट यांनी म्हटले आहे.

मंडल आयोगाविरोधात आवाज उठवाच!

भुजबळांचे जरांगे पाटील यांना आव्हान



मुंबई : मनोज जरांगे यांच्यासारखा ज्ञानी हिंदुस्थानात दुसरा कोणी आहे का? तीन कोटी लोक मुंबईत आणणार होते. त्यांनी किती लोक आणले, वाशीमध्ये सगळ्यांनी बघितले. ज्याला लाख म्हणजे काय अन् कोटी म्हणजे काय, हे कळत नाही, तेच आता देशामध्ये मंडल आयोगाला विरोध करणार आहेत. त्यांच्यात हिंमत असेल तर मंडल आयोगाच्या विरोधात आवाज द्यावा, माझे आव्हान मंत्री छगन भुजबळ यांनी बुधवारी जरांगे पाटील यांना दिले.

भुजबळ म्हणाले, ''झुंडशाहीपुढे नमते घेऊन लाखो लोकांना ओबीसी आरक्षणात मागच्या दाराने प्रवेश दिला जात आहे. एवढेच नव्हे तर आता सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याचे सुरू झाले आहे. त्यामुळे आम्हाला सरकार, प्रशासन आणि न्यायालयाकडे दाद मागावी लागणार आहे. लोकशाहीने आम्हाला जे अधिकार दिले आहेत, त्याचा आम्ही वापर करणार आहोत. मराठा समाजाचे जे माहितीगार आहेत, अभ्यासक आहेत, ते म्हणतायत की, आम्हाला मराठा म्हणून वेगळे आरक्षण द्या. परंतु, सध्या झुंडशाहीपुढे नमते घेऊन निर्णय घेतले जात आहेत. ते एका जातीसाठी लढत आहेत, मी ३७४ जातींसाठी लढत आहे.''

महिला, जेष्ठ नागरिक, दिव्यांगांसाठी योजना

उद्या सादर होणार देशातील सर्वांत श्रीमंत महापालिकेचा 'अर्थसंकल्प'

मुंबई : महिला, जेष्ठ नागरिक, दिव्यांगासाठी विविध योजना, संपूर्ण स्वच्छता अभियानासाठी विशेष तरतूद, शिक्षण, आरोग्यासाठी भरीव तरतूद, नव्याने येणाऱ्या नगरसेवकांसाठी राखीव निधी अशा कोट्यवधी रुपयांच्या तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात येणार आहे. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबई महापालिकेचा सन २०२४-२५ अर्थसंकल्प उद्या शुक्रवारी मांडण्यात येणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कोणतीही कर वाढ नसल्याने मुंबईकरांसाठी ही दिलासादायक बाब आहे.

आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मुंबई महापालिकेचा सन २०२४-२५ चा अर्थसंकल्प उद्या शुक्रवारी मांडण्यात येणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात मुंबईकरांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यात विशेष म्हणजे महिलांवरील वाढत्या अत्याचार प्रतिबंध उपाययोजना, महिला सक्षमीकरण, सबलीकरण यादृष्टीने महिलांना प्रशिक्षण देणे, महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये अशा विविध तरतुदी यंदाच्या अर्थसंकल्पात खास करुन महिलांसाठी करण्यात येणार आहेत.



यंदाच्या अर्थसंकल्पात या गोष्टीचा समावेश!

- अग्निशमन सेवेची दर्जोन्नती करणे
- गलिच्छ वस्ती सुधारणा आणि त्याची दर्जोन्नतीबाबत ठोस उपाययोजना करणे
- जुन्या उद्यानांचा विकास करणे, विकसित उद्यानांची दर्जोन्नती करणे / त्यांची जोपासना करणे, नव्याने
- विकसित झालेल्या प्रभागात उद्याने उभारणे
- शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता, दर्जामध्ये सुधारणा
- भूमिगत मार्केट, कोळीवाड्याचा विकास

अग्निशमन दल सक्षम करणार!

आपत्कालीन परिस्थितीत मुंबई अग्निशमन दलाची महत्वाची भूमिका असते आणि ती भूमिका अडीच हजार जवान जीवाची बाजी लावत बजावतात. अग्निशमन दलात मनुष्यबळ वाढवण्यात येत असून लवकरच ९१० जवान तैनात करण्यात येणार आहे.

३९ वर्षांनी प्रशासक सादर करणार अर्थसंकल्प!

मुंबई महापालिकेत १९८४ साली प्रशासक राज्य होते. त्यानंतर तब्बल ३८ वर्षांनंतर मुंबई महापालिकेत प्रशासकीय राज्य आहे. मुंबई महापालिकेत ७ मार्च २०२२ रोजी निवडून आलेल्या नगरसेवकांची मुदत संपल्याने ८ मार्चपासून प्रशासकाच्या हाती कारभार आहे. त्यानंतरच्या काळात आतापर्यंत पालिका निवडणूक झालेली नाही. त्यामुळे २०२४-२५ चा अर्थसंकल्प तब्बल ३९ वर्षांनी प्रशासकाच्या माध्यमातून मांडला जाणार आहे. सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज शुक्रवार, २ फेब्रुवारी रोजी महानगरपालिका सभागृहात दुपारी १२ वाजता अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे या शिक्षण खात्याचे अर्थसंकल्पीय अंदाज प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल यांना सादर करतील. तर अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू महानगरपालिकेचा अर्थसंकल्पीय अंदाज प्रशासक डॉ. इक्बाल सिंह चहल यांना सादर करणार आहेत.

राज्यातील १७ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या



प्रतिनिधी/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने बदल्यांना सुरूवात केली आहे. बुधवारी १७ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. सामान्य प्रशासन प्रशासन विभागाने बदल्यांचा आदेश जारी केला असून, त्यानुसार मुंबई शहर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांची बदली मुंबई उपनगर जिल्हाधिकारीपदी करण्यात आली आहे. तसेच वस्तू आणि सेवा कर विभागाचे विशेष आयुक्त नितीन पाटील यांची बदली राज्य मानवाधिकार आयोगाच्या सचिवपदी झाली आहे. गेली अनेक वर्ष महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळात सह व्यवस्थापकीय संचालकपदावर कार्यरत असलेल्या संजय यादव यांच्याकडे मुंबई शहर जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव अभय महाजन वस्तू आणि सेवा कर विभागाच्या विशेष आयुक्तपदी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांची राज्य शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संचालकपदी, तर अमोल येडगे यांची कोल्हापूरचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदाल यांची राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालकपदी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते यांची प्रशासक (नवीन टाउनशिप), सिडको, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अवश्यंत पांडा यांची आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर म्हणून बदली करण्यात आली आहे.

अहेरी उपविभागाचे सहाय्यक जिल्हाधिकारी वैभव वाघमारे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम येथे, तर डहाणू उपविभागाच्या सहाय्यक जिल्हाधिकारी संजीता महापात्रा यांची अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तळोदा सहाय्यक जिल्हाधिकारी मंदार पत्की यांची यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, तर मुख्य सचिव कार्यालयातील सहसचिव मकरंद देशमुख यांची सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर नतिशा माथूर यांची प्रकल्प अधिकारी तळोदा आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, तळोदा उपविभाग, नंदुरबार म्हणून नेमणूक झाली आहे.

बल्लारपूर उपविभागाच्या सहायक जिल्हाधिकारी मानसी यांची सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली तर चांदवड उपविभागाचे सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकित सिंग यांची प्रकल्प अधिकारी कळवण आणि सहायक जिल्हाधिकारी, कळवण उपविभाग नाशिक आणि बीड उपविभागाच्या सहाय्यक जिल्हाधिकारी करिश्मा नायर यांची प्रकल्प अधिकारी जव्हार आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार उपविभाग, पालघर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मरीन लाइन्स उड्डाणपुलाजवळ काचेची लिफ्ट

मुंबई : गरोदर महिला, जेष्ठ नागरिक यांना पादचारी पुलावर सहजरीत्या ये जा करता यावी यासाठी मरीन लाइन्स सार्वजनिक उड्डाणपुलाजवळ दोन्ही बाजूला काचेच्या लिफ्ट बसवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

मरीन लाइन्स येथे पादचारी पूल असून, शिड्या चढ-उतार करताना जेष्ठ नागरिक गरोदर महिलांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूला काचेच्या लिफ्ट बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एचव्हीबी ग्लोबल अकॅडमी, मरीन लाईन्स येथील सार्वजनिक उड्डाणपुलाजवळ सुरक्षा यंत्रणेसह ६ मी. उंच १५ प्रवासी ग्लास लिफ्ट आणि ९ मी. उंचीची १५ प्रवासी ग्लास लिफ्ट बसवण्यासाठी बुधवारी निविदा मागवण्यात आल्या आहेत.

मरीन लाइन्स येथे पादचाऱ्यांसाठी पादचारी पूल बांधण्यात आला आहे. परंतु या पादचारी पुलावर ये-जा करताना जेष्ठ नागरिक गरोदर महिला याची मोठी गैरसोय होते. त्यामुळे या पादचारी पुलावर लिफ्ट बसवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांनी लावून धरली होती. अखेर या पादचारी पुलाच्या दोन्ही बाजूला काचेच्या लिफ्ट बसवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

शिखर बँक घोटाळाप्रकरणी अजित पवारांना दिलासा

मुंबई पोलिसांचा अतिरिक्त क्लोजर रिपोर्ट दाखल

मुंबई : महाराष्ट्र सहकारी बँकेतील (शिखर बँक) २५ हजार कोटींच्या घोटाळा प्रकरणात मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (ईओडब्ल्यू) अखेर सत्र न्यायालयात अतिरिक्त क्लोजर रिपोर्ट दाखल केला. कथित घोटाळ्याच्या पुढील तपासात काही ठोस आढळले नाही, असा निष्कर्ष काढून पोलिसांनी हा क्लोजर रिपोर्ट सादर केला. यामुळे या प्रकरणातील ईडीचा तपासही थंड होण्याची शक्यता असल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शिखर बँक घोटाळ्याचा तपास दोषपूर्ण असून, आर्थिक गुन्हे शाखेने सप्टेंबर २०२० मध्ये दाखल केलेला तपासबंद अहवाल (क्लोजर रिपोर्ट) न्यायालयाने रद्द करावा, अशी विनंती करीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यासह शालिनीताई पाटील व माणिकराव जाधव यांनी सत्र न्यायालयात निषेध याचिका दाखल केल्या आहेत. त्या याचिकांवरील सुनावणी प्रलंबित असतानाच ईओडब्ल्यूने अजित पवार यांच्याविरुद्ध काही ठोस सापडले नसल्याचा निष्कर्ष काढून क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. हा अहवाल सुनावणीवेळी न्यायालयापुढे सादर झाल्यानंतर न्यायालय काय भूमिका घेतेय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायालयाने हा अहवाल स्विकारल्यास घोटाळ्यातून अजित पवार यांची सहीसलामत सुटका होणार आहे.

विशेष सत्र न्यायाधीश राहुल रोकडे यांच्यापुढे या प्रकरणाची सुनावणी सुरु आहे. दरम्यान, आम्ही दाखल केलेल्या निषेध याचिका प्रलंबित असताना तपास यंत्रणेने क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. याला आम्ही आव्हान देणार आहोत, असे अण्णा हजारे यांच्या वतीने ॲड. सतिश तळेकर यांनी स्पष्ट केले.

लहानग्यांनी अनुभवले बँकेचे व्यवहार नेणवली शाळेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत बँक आपल्या भेटीला उपक्रम संपन्न



सुधागड -पाली

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत राजीप शाळा नेणवली येथे बँक आपल्या भेटीला हा उपक्रम नुकताच संपन्न झाला. याअंतर्गत एचडीएफसी बँक शाखा पाली सुधागडचे बँक व्यवस्थापक संजय नाईक व त्यांचे सर्व सहकारी यांनी नेणवली शाळेत येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला व बँकेच्या व्यवहारांची माहिती दिली. संजय नाईक यांनी मुलांना समजतील अशा छोट्या गोष्टी व प्रश्न संवाद साधून बचतीचे महत्व समजावून सांगितलं. त्याच बरोबर बँक कशासाठी असते?, बचत कशी करावी?, खाते कसे काढावे?, यूपीआय कसे असते?, त्याचा वापर, ऑनलाईन बँक खाते कसे कार्य करते?, व्याज कसे मिळते?, ते व्याज कोण देते?, आपली रक्कम कशी सुरक्षित असते?, आणि आपण बँकेत खाती का काढावी या बाबत प्रत्यक्ष भरणा पावती व पैसे काढणे पावती, चेकबुक दाखवून मुलांना मार्गदर्शन केले. मुलांनी सुद्धा बँके बाबत प्रश्न विचारून नफा तोटा, व्याज तसेच बँकेत नियुक्ती कशी होते?, त्यासाठी कोणते शिक्षण आवश्यक याबाबत माहिती विचारली. मान्यवरांचे स्वागत व आभार मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी मानले. सोबत विषय शिक्षक रवींद्र हंबीर व उपशिक्षक गणपत वरगडे होते. शेवटी बँक कर्मचारी यांनी बँकेविषयी माहितीपत्रक सर्व विद्यार्थ्यांना वाटून पालकांना माहिती देण्यास सांगितले.

इयत्ता १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणात बँक, नेटबँकिंग, बचत व गुंतवणूक याची जाणीव व मार्गदर्शन मिळावे हा या उपक्रमाचा मूळ उद्देश होता. विद्यार्थ्यांना याबाबत सविस्तर माहिती मिळाली.- राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, नेणवली



तिवरे शाळेचे शिक्षक रविंद्र आंधळे यांचा जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात तिसरा क्रमांक

कळंबोली येथे संपन्न झाले ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन

पाली, ता. १ (अमित गवळे) सुधागड तालुक्यातील तिवरे शाळेचे शिक्षक रविंद्र आंधळे यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिक्षक प्रतिकृतीमध्ये तिसरा क्रमांक पटकावला आहे. कळंबोली ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. बुधवारी (ता.३१) दुपारी बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

रवींद्र आंधळे यांनी हसत खेळत ज्ञानरचनावाद ही प्रतिकृती तयार केली होती. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन रविंद्र आंधळे यांना गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील शिक्षक, विद्यार्थी, नातेवाईक, मित्रपरिवार व मान्यवरांनी रवींद्र आंधळे यांचे अभिनंदन केले.



निवडक ठाणे

जंजिरा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

मुरूड-जंजिरा : रायगड प्रेस क्लब व मुरूड तालुका पत्रकार संघातर्फे आझाद चौक, मुरूड येथे जंजिरा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुरूड नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुरूड नायब तहसीलदार संजय तवर, रायगड प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष मनोज खांबे, मुरूड शहरांतील नागरिक तसेच सर एस.ए.उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक वृंद,व्यापारीवर्ग तसेच माजी नगराध्यक्ष, नगरसेवक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जंजिरा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीबाबत मार्गदर्शन करतांना पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मेघराज जाधव यांनी सांगितले की, रायगड प्रेस क्लब व मुरूड तालुका पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १३ वर्षांपासून जंजिरा मुक्ती संग्राम दिन साजरा करीत आहे.

वीज चोरांविरुद्ध कारवाई

ठाणे: महावितरणच्या वाडा उपविभागात ७९ वीज चोरांविरुद्ध जानेवारी महिन्यात कारवाई करण्यात आली आहे. या वीज चोरट्यांनी ३२ लाख ५८ हजार रुपये किमतीची १ लाख ५० हजार ४९४ युनिट विजेची चोरी केल्याचे उघड झाले आहे. मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीजचोरी शोध मोहीम नियमितपणे सुरू आहे. त्यांतर्गत वाडा उपविभागातील वाडा, अशोकवन, मैंदे, आमगाव, गायकरपाडा, डोंगस्ते, बिलावली, तुसा, काटी, देवघर, जामधर, उंबरखांड, पाच्छापूर, नेवाळे, खांबाळे, महाप, शिरोळे, बासे, वापे, खरीवली, दिघाशी, जांबिवली, चिंचघर, बिलोशी आदी परिसरात व्यापक वीजचोरी शोध मोहीम राबवण्यात आली. या शोध मोहिमेत ७९ जणांकडून सुरू असलेली ३२ लाख ५८ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आली.

मुरबाडमधील तिरंगा ध्वजाचे गिनीज बुकात नोंद

मुरबाड : मुरबाड विधानसभा ठाणे जिल्ह्याचे भाजप आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड माळशेज घाटात भारतातील सर्वात मोठी नैसर्गिक दोन हजार फूट झीप लाईन आणि एक हजार फुटाचा तिरंगा उभारला आहे. त्याचे उद्घाटन आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी मोठ्या थाटामाटात करण्यात आले. जगाच्या नकाशावर माझा मुरबाड मतदार संघाची ओळख व्हावी, यासाठी त्यांनी माळशेज घाटात देशामधील सर्वात उंच व सर्वात लांब काचेच्या पुलाला मंजुरी मिळवली. मुरबाड माळशेज घाट झीप लाईन आणि १००० फूट तिरंगा ध्वजाचे गिनीज बुकात नोंद केली जाणार आहे.



आगरी सेना जिल्हा संपर्क कार्यालयाची स्थापना

वसई : केवळ आगरी समाजाच्याच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेचे प्रश्न आणि नागरी समस्या सोडविण्यासाठी ध्यास घेऊन प्रयत्न केला पाहिजे. भूमिपुत्रावरील अन्याय किंवा स्थानिकांच्या हक्कासाठी संघटितपणे लढा देऊन आपले अधिकार अबाधित ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन आगरी सेना संस्थापक, तथा प्रमुख राजाराम साळवी यांनी विरार येथे बोलतांना काढले. आगरी सेनेच्या पालघर जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन नुकतेच पाटील कंपाऊंड, चंदनसार, विरार (पूर्व) येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी आगरी सेना प्रमुख राजाराम साळवी, प्रदेश उपाध्यक्ष कैलास पाटील, खासदार राजेंद्र गावीत, काँग्रेस नेते विजय पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, मनीषा पाटील, राहुल साळवी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आरोग्य सेविका सुजाता तुस्कानो, वसई-विरार पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलराज रोकडे, मंगेश शेलार, मोरेश्वर पाटील, अमोल अंधारे, महेश भगत, नरेश भोईर, संदेश पवार, पत्रकार शशी कर्पे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कार्यकर्त्यांना वीर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच पत्रकारांचाही सन्मान करण्यात आला.

गुन्हेगारी रोखण्यात नवी मुंबई पोलिसांना यश

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांचा दावा

नवी मुंबई : सायबर सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईमध्ये २०२३ या वर्षामध्ये खून, खुनाचा प्रयत्न, दुखापत, मालमत्ता विषयक, फेटल अपघात, महिला अत्याचार यासारख्या गुन्ह्यात घट झाली असली तरी सायबर गुन्ह्यांचा आलेख चढताच राहिला आहे. मात्र, गत वर्षात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी एकही घटना घडली नाही, तसेच कुठल्याही प्रकारची जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणारी घटना घडली नसल्याचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२३ मध्ये महिला विषयक दाखल झालेल्या एकूण ७०३ गुन्ह्यांपैकी ६८९ (९८ टक्के) गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२२ च्या तुलनेत महिला विषयक गुन्हे ५९ ने कमी झाल्याचे दिसून येत आहे. २०२३ मध्ये बलात्काराचे एकूण २९९ गुन्हे दाखल झाले असून यातील सर्व गुन्हे उघडकीस आले आहेत. २०२२ च्या तुलनेत २०२३ मधील बलात्काराच्या गुन्ह्यात ४२ ने घट झाली आहे. तसेच २०२३ मध्ये अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या दाखल पोक्सोच्या एकूण १२३ गुन्ह्यातील सर्व गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये पोक्सोच्या गुन्ह्यात ७ ने घट झाल्याचे आकडेवारीत दिसून येत आहे. २०२३ मध्ये विनयभंगाचे ३८५ गुन्हे घडले असून त्यापैकी ३७१ गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यात २०२२ च्या तुलनेत २२ ने घट झाल्याचे दिसून येत आहे. तसेच सासरकडील मंडळीकडून होणाऱ्या छळवणुकीच्या गुन्ह्यात घट झाल्याचे दिसून येत असले तरी महिलांची छळवणूक, हुंडाबळी, आत्महत्येस प्रवृत्त केल्यासंबधीच्या गुन्ह्यात १४ ने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

२०२३ मध्ये शरीराविरुद्धच्या एकूण ८२५ दाखल गुन्ह्यांपैकी ८०७ (९८ टक्के) उघडकीस आले आहेत. २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये शरीराविरुद्धच्या गुन्ह्यात ७५ ने घट



झाली आहे. यात २०२३ मध्ये खुनाचे ३७ गुन्हे घडले असून त्यातील ३४ गुन्हे उघडकीस आले आहेत. २०२२ च्या तुलनेत खुनाच्या गुन्ह्यात २ ने घट झाली आहे. तर खुनाचा प्रयत्न या गुन्ह्यात १० ने वाढ झाली आहे. फसवणुकीचे ८१२ गुन्हे घडले असून त्यापैकी ४६२ गुन्हे उघडकीस आले आहेत. २०२२ च्या तुलनेत आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात १४९ ने वाढ झाली आहे. यात ठकबाजीचे ४४५ गुन्हे दाखल असून त्यातील ३६९ गुन्हे उघडकीस आले आहेत. विश्वासघाताचे ५६ गुन्हे दाखल असून त्यापैकी ५३ उघडकीस आले आहेत. २०२३ मध्ये पोलीस बतावणीच्या ८ घटना घडल्या असून या गुन्ह्यात २०२२ वर्षाच्या तुलनेत १२ ने घट झाल्याचे दिसून येत आहे. मालमत्तेविषयक २३४८ दाखल गुन्ह्यांपैकी ११७० (५० टक्के) गुन्हे उघडकीस आले आहेत. २०२२ च्या तुलनेत ९९ ने घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. एकूण आकडेवारीवरून नवी मुंबई पोलिसांची २०२२ वर्षाच्या तुलनेत २०२३ मध्ये गुन्हे उघडकीस आणण्याच्या प्रमाणात ६ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

भाजप-शिंदे गटात कंटेनर वाद

केळकर यांची कारवाईची मागणी तर सरनाईक यांचे भाजपला प्रत्युत्तर

ठाणे : घोडबंदर परिसरातील धर्मवीरनगर येथील तुळशीधाम भागात महापालिकेची जागा बळकावून चक्क कंटेनर शाखा उभारण्यात आली आहे. हा कंटेनर तत्काळ हटवावा अन्यथा त्याशेजारीच प्रतीकात्मक दोन कार्यालये थाटण्याचा इशारा केळकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिला. भाजपच्या इशाऱ्यानंतर शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाई यांनी भाजपला प्रत्युत्तर देत कंटेनर शाखा म्हणजे अनधिकृत बांधकाम नसल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतरच याबाबत विचार केला जाणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे ठाण्यात सध्या भाजप-शिंदे गटात कंटेनर वाद सुरू झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कंटेनर शाखा ठाण्यातील शिवाई नगर, मनोरमानगर, मुंब्रा आणि भाईंदर येथे देखील मोठ्या प्रमाणात आहे. मात्र या दोघांच्या वादात पालिका आयुक्त काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दस्तुरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देऊनही ठाणे शहरात राजरोसपणे अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचे भांडाफोड आमदार संजय केळकर यांनी पुराव्यानिशी ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासमोर केला आहे. शहरातील विविध भागातील नागरिकांनी केलेल्या तक्रारींचा लेखाजोखा मांडत आ. संजय केळकर यांनी महापालिका आयुक्त बांगर यांना जाब विचारला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर ठाणे शहरासह सर्व महापालिकांमध्ये अनधिकृत बांधकामे होणार नाहीत आणि झाली तर या बांधकामांवर कारवाई होईल. शिवाय बांधकामांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असे सभागृहात सांगितले होते. ही घोषणा हवेत विरता कामा नये, अशा अनधिकृत बांधकामांवर प्रत्यक्षात कारवाई होणे



कंटेनर शाखा म्हणजे अनधिकृत बांधकाम नव्हे

ठाणे महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर कंटेनर शाखा उभारण्यावरून एकीकडे भाजपचे आमदार संजय केळकर यांनी शिवसेनेला (शिंदे गट) टार्गेट केले असताना आता शिवसेनेच्या आमदारांनीही भाजपला प्रत्युत्तर दिले आहे. कंटेनर शाखा या नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी उभारल्या जातात. कंटेनर शाखा म्हणजे अनधिकृत बांधकाम नसल्याचे प्रत्युत्तर आमदार प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. जर ही शाखा आरक्षित भूखंडावर असेल तर त्याची माहिती घेण्यात येईल, मात्र नागरिकांना त्रास होत असेल आणि नागरिकांच्या तक्रारी आल्या तरच शाखा काढू, अशी भूमिका सरनाईक यांनी घेतली आहे.

दोन प्रतीकात्मक कार्यालये थाटणार

महापालिकेनेही या ठिकाणी स्वत:चा फलक लावून अतिक्रमण न करण्याचे निर्देश दिले होते. तरीही २४ जानेवरी रोजी याठिकाणी भलामोठा कंटेनर ठेवून २७ जानेवारी रोजी त्या कंटेनरवर झेंडा व फलक झळकवण्यात आल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आणताच आयुक्तांनी तात्काळ फोनाफोनी करून कारवाईचे आदेश दिल्याचे आ. केळकर यांनी सांगितले. दरम्यान, राजरोसपणे अतिक्रमण करण्याची इतकी हिंमत होतेच कशी? तेव्हा, तातडीने ही अनधिकृत कंटेनर शाखा हटवावी, अन्यथा याच ठिकाणी दोन प्रतीकात्मक कार्यालये थाटण्याचा इशारा आ. केळकर यांनी दिला आहे.

गरजेचे असल्याचे आ. केळकर यांनी बजावले. धर्मवीरनगर येथील तुळशीधाम भागात ठाणे महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याचेही आ. केळकर यांनी सचित्र दाखवले. महापालिकेनेही या ठिकाणी स्वतःचा फलक लावून अतिक्रमण न करण्याचे निर्देश दिले होते. तरीही याठिकाणी भलामोठा कंटेनर ठेवून त्या कंटेनरवर झेंडा व फलक झळकवण्यात आल्याचे आमदार संजय केळकर यांनी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या निदर्शनास आणून दिले.

कामगार, व्यापारांसाठी व्यापारी-माथाडी बचाव कृती समितीची स्थापना



नवी मुंबई : माथाडी कामगार आणि व्यापारी यांचे प्रश्न सोडवण्यासाठी व्यापारी व माथाडी बचाव कृती समितीची लवकरच स्थापना करण्याचा निर्णय एका बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे नेते माजी आमदार नरेंद्र पाटील यांनी दिली.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवी मुंबईतील बाजारपेठांमधील माथाडी व व्यापारी वर्गाच्या विविध प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे नेते माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील व आमदार शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकारी यांची माथाडी भवन येथे ही बैठक झाली.

पणन संचालनालयाने परिपत्रक रद्द करणे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र वाढविणे,कोल्ड स्टोरेजमध्ये अनधिकृत व्यवसाय केला जात आहे तो थांबविणे, माथाडी कामगारांच्या मुलांना माथाडी मंडळाच्या कार्यालयीन सेवेत घेणे, सल्लागार समिती व माथाडी बोर्डाच्या पुनर्रचना करणे या व व्यापारी आणि माथाडी कामगारांच्या इतर न्याय्य प्रश्नांची सोडवणूक करण्याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात येणार आहे. समितीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास विधायक मार्गाने तीव्र आंदोलन करण्याची भूमिका कृती समितीच्या माध्यमातून घेतली जाईल, असा निर्णय एका बैठकीत घेण्यात आला.

या बैठकीस मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा-बटाटा मार्केट, मसाला मार्केट, दाणाबंदर मार्केट, भाजीपाला व फळे मार्केटमधील व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी मोहन गुरनानी, शंकर पिंगळे, संजय पानसरे, चंद्रकांत ढोले, कैलास तांजणे, अशोक बढीया पदाधिकारी उपस्थित होते.

भिवंडीत १२ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

भिवंडी : शहरातील खंडूपाडा येथील बाबा हॉटेलजवळ प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करताना शांतीनगर पोलिसांनी ट्रकचालकास ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्याच्याकडून १२ लाख ४५ हजार ६०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे. दरम्यान त्याच्या अन्य चार साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जानेवारी रोजी वंजार पट्टी परिसरातील खंडूपाड्यातून मानवी शरीरास विघातक सुगंधित प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती शांतीनगर पोलिसांना मिळाली होती, त्यानुषंगाने पोलिसांनी खंडूपाडा परिसरात सापळा रचला होता. त्यावेळी संशयित ट्रक पोलिसांना निदर्शनास आला.

दरम्यान ट्रकची झाडाझडती घेतली असता, ट्रकमध्ये प्रतिबंधित विमल केसरयुक्त पानमसाला व व्ही १ सुगंधी तंबाखूची वाहतूक करताना आढळल्याने पोलिसांनी गुटखा जप्त करीत ट्रकचालक मोहम्मद अली अंसिर खान (३४) याच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून ताब्यात घेऊन अटक केली आहे. तर पोलिसांची कुणकुण लागताच मोहम्मदचे अन्य ४ साथीदार रियाज शेख, लाला भाई उर्फ जावेद, राजकुमार सपाटे, गुलजार अहमद शेख हे फरार झाले आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पुढील तपास सपोनि अरुण घोलप करीत आहेत.

जिल्ह्यात महाविकास आघाडीचा पुन्हा झेंडा फडकवू

आमदार सुनिल भुसारा यांचे प्रतिपादन

जव्हार: आज भाजप आणि विरोधक धार्मिक मुद्दे पुढे आणून जातीच्या नावावर राजकारण करीत आहेत. सर्व घटक पक्षाकडून याचवेळी वाढती महागाई, बेरोजगारी, २कोटी नोकऱ्यांचे आश्वासन, १५ लाख देण्याची घोषणा यांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. तशीच स्थिती राज्यातही आहे, यामुळे या शक्तीला रोखण्यासाठी देशात इंडिया आघाडी एकत्र झाली आहे. अशावेळी पालघर जिल्ह्यात त्यांचा पराभव करण्यासाठी माहविकास आघाडीची वज्रमूठ आपण बांधली असून या आधी सुध्दा आघाडीतून लढलेल्या महाआघाडीचे सर्व आमदार विधानसभांवर निवडून आले होते. यावेळी तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आपल्यासोबत आहे. यामुळे जिल्ह्यात पुन्हा आपला महाविकास आघाडीचा झेंडा फडकवू, असा विश्वास आमदार सुनिल भुसारा यांनी यावेळी व्यक्त केला.

पालघर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सध्या महाविकास आघाडीतील घटक पक्षाकडून बैठकांचा धडाका लावला असून यामध्ये ठाकरे गट, राष्ट्रवादी, सीपीएम, काँग्रेस या पक्षातील सर्व प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विकास मोरे यांनी आपण सर्व एकत्र आलो आहोतच, उद्धव ठाकरे यांना काँग्रेस राष्ट्रवादी यांनी साथ दिली आहे. त्यामुळे उमेदवार कोणाचाही आणि कोणताही असो त्याला पूर्ण ताकदीने निवडून देऊन जिल्हा भाजपमुक्त करण्याचे आवाहन मोरे यांनी केले आहे. सहसंपर्क प्रमुख निलेश गंधे यांनी सांगितले की, उमेदवार स्थानिकच देण्यात येईल यामुळे येथील विकास करण्यास तो कटीबध्द असेल.

ईडीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे आज आंदोलन

नवी मुंबई : आपण सर्वजण लोकांच्या हितासाठी आणि महाराष्ट्र धर्म टिकवण्यासाठी संघर्ष करत आहोत. पण संघर्ष करणाऱ्या आपल्या अनेक लोकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असून आमदार रोहित पवार यांच्यावर ईडीकडून केल्या जाणाऱ्या कारवाईविरोधात गुरुवार १ फेब्रुवारी रोजी बेलापूर येथील कोकण भवन येथे आंदोलन करण्यात येणार आहे.

यावेळी सर्वसामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे घेऊन लढत असल्याने या आंदोलनाच्या माध्यमातून लोकांच्या प्रश्नावर जोरदार आवाज उठवणार असून झोपेचे सोंग घेणाऱ्या या सरकारला जागे करायचे असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष चंद्रकात पाटील यांनी सांगितले.



बेकायदेशीर डेब्रिजचे व्यवस्थापन करा

न्यायालयाचे शासनाला आदेश

उरण : वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील सिडको व वनखात्याच्या जागांवर मुंबईतील दुर्गंधीयुक्त कचरा व डेब्रिज बेकायदा टाकले जात असल्याने याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर दिलेल्या आदेशानुसार शासनाने या डेब्रिजची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यासाठी आठ सदस्यीय समितीची घोषणा केली आहे. या समितीकडून डेब्रिजची विल्हेवाट लावून त्याचे नियोजन करून त्याचा अहवाल शासनाला सादर करीत प्रत्येक महिन्याला 'एनजीटी'ला देण्याची सूचना या अध्यादेशात करण्यात आली आहे.

वहाळ येथील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र महादेव पाटील यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने ८ ऑगस्ट २०२३ ला वहाळ परिसरात डेब्रिजमुळे होणारे प्रदूषण, घनकचरा यांची विल्हेवाट आणि व्यवस्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. या आठ सदस्यीय समितीचे अध्यक्ष म्हणून सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक, तर सदस्य म्हणून उपविभागीय अधिकारी महसूल विभाग, उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन बृहन्मुंबई महानगरपालिका, उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन, पनवेल महानगरपालिका, उप मुख्यकार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई, सिडकोचे तज्ज्ञ सदस्य नियुक्ती व मुख्य अभियंता एनएमआयए- एस पी सिडको यांची सदस्य म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे.

मुंबईतील हजारो टन डेब्रिज व कचरा काही व्यावसायिक दलालांनी जासई, वहाळ परिसरांत टाकण्याची नामी शक्कल लढविली आहे. येणाऱ्या हजारो टन कचरा, डेब्रिजमुळे उरण-पनवेल मागानजिकच्या सिडको व वनखात्याच्या जागांवर या कचऱ्याचे जमिनीपासून ५० फुटांपर्यंत कृत्रिम डोंगरच निर्माण झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. त्यांनी मुंबईतील डेब्रिज वहाळ आणि रायगडच्या हद्दीत येऊ नये, याची दक्षता घेण्याची मागणी केली आहे.

- राजेंद्र महादेव पाटील, याचिकाकर्ते

समितीच्या धडक कारवाईने बोगस डॉक्टर भूमिगत

मोखाड्यात बोगस डॉक्टरांवर कारवाई

मोखाडा : मोखाड्यात बोगस डॉक्टरांची संख्या अधिक असल्यामुळे बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली आहे. दीड महिन्यात दोन बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील गाव पाड्यांत दुकाने मांडून बसलेल्या बोगस डॉक्टरांचे धाबे दणाणले असून बहुतांश बोगस डॉक्टरांनी आपली दुकाने बंद करून भूमिगत झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

आदिवासी भागात गाव, पाड्यांमध्ये वैद्यकीय सेवेचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. त्याचा फायदा घेऊन वेगवेगळ्या राज्यातील बोगस डॉक्टरांनी गाव, पाड्यांमध्ये वैद्यकीय व्यवसाय सुरू केले आहेत. अनेक वर्षे व्यवसाय करून त्यांनी मोठी माया देखील गोळा केली आहे. या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत



नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून कारवाईबाबत चालढकल करण्यात येत असल्याचे चित्र होते. अखेर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी मोखाड्यात ७ डिसेंबरला स्वतः येऊन कारवाई केली आहे. त्यांनी बोगस डॉक्टरांचा पर्दापाश करून त्यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर प्रत्येक तालुकास्तरावर बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

दीड महिन्याच्या अंतराने २३ जानेवारीला तालुकास्तरीय बोगस डॉक्टर शोध समितीने मोखाड्यातील मोरचोंडी येथील बोगस दवाखान्यावर छापा टाकून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या धडक कारवाईमुळे गाव, पाड्यांत दुकाने थाटून बसलेल्या बोगस डॉक्टरांनी कारवाईचा धसका घेत, आपली दुकाने बंद करून पळ काढल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

वरिष्ठांच्या आदेशानुसार तालुक्यात बोगस डॉक्टरांची शोध मोहीम सुरू केली आहे. बोगस डॉक्टरांची माहिती मिळताच त्याची पडताळणी करून बोगस डॉक्टर शोध समितीमार्फत तेथे छापा टाकण्यात येत आहे. मोरचोंडी येथील बोगस डॉक्टरांबाबत देखील माहिती मिळाल्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. मात्र, बोगस डॉक्टर शोध मोहीम सुरूच ठेवणार आहे.

- डॉ. भाऊसाहेब चत्तर, तालुका वैद्यकीय अधिकारी

तालुक्यात काही ठिकाणी अजूनही बोगस डॉक्टर कार्यरत आहेत. बोगस डॉक्टरांसह काही डॉक्टर गरीब रुग्णांना इंजेक्शन आणि सलाईनचा डोस देत प्रत्येकी हजार ते दीड हजार रुपये घेऊन त्यांची लूट करत आहेत. त्याला पायबंद घालावा अशी तक्रार मी सर्वसाधारण सभेत केली आहे. आता पुन्हा तशी तक्रार करणार आहे.

-हबीब शेख, जिल्हा परिषद सदस्य

शासनमान्य भात खरेदी केंद्र सुरू न केल्याने शेतकरी व्यापाऱ्यांच्या कचाट्यात. लोकप्रतीनिधींचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष.



दै. जनप्रभात
तळा /प्रतिनिधी

किशोर पितळे:तळा तालुक्यात शासनमान्य भात खरेदी केंद्र सुरू न केल्याने परिसरातील शेतकरी व्यापाऱ्याच्या कचाट्यात सापडला आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह व मुलांच्या शिक्षणासाठी मेहनतीने कमावलेला व निसर्गाच्या कोपातून वाचलेले भात खासगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावाने विकावे लागत असल्याने शेतकऱ्यांना यावर्षी चांगला भात पिकूनही मेहनतीचे फळ मिळत नसल्याने व शासनाने तळा तालुक्यात भात खरेदी केंद्र सुरू न केल्याने शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. तळा डोंगराळ दुर्गम तालुका असला तरी पावसावर अवलंबून शेतकरी असला तरी एकमेव पीक असल्याने भातशेती करीत असतो तालुक्यात भात खरेदी केंद्र सुरू न केल्याने शेतकरी शासनाच्या विरोधात संताप व्यक्त करीत आहेत.यापुर्वी माणगांव तालुका असताना माणगांवयेथे कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत खरेदी केलीजात असे.तालुका झाल्यावर तरी शासनमान्य खरेदी विक्री केंद्र होईल पण २५वर्षाच्या कालखंडात लोकप्रतीनीधींनी पाने पुसली.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण,पनवेल, खालापुर, कर्जत, सुधागड, रोहा, श्रीवर्धन माणगाव, महाड, पोलादपुर, म्हसळा या तालुक्यातील ३८ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत परंतु केवळ तळा तालुक्यात भात खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले नाही हे येथील लोकप्रतनिधींचे अपयश आहे.रायगड जीह्याचे तत्कालीन पालकमंत्री ना.रवींद्र चव्हाण यांच्या प्रयत्नाने दि.२५/११/१८ रोजी बोरघर हवेली येथे आधारभूत शासकीय भात खरेदी केंद्र सुरू करण्यात आले होते.त्यानंतर २३/१२/२०२२ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती माणगांव उपकेंद्र तळा यांचे वतीने भात खरेदी केंद्र सुरू करण्यात आले .परंतु गेल्या दोन वर्षात या सरकारने तळा तालुक्यात भात खरेदी केंद्र अजून सुरू केलेले नाही.रायगड जिह्यात विशेष करून तालुक्यात भाताबरोबरच आंब्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जातआहे.यावरशेतकऱ्यांचे उत्पन्न अधिक आहे.शेतकऱ्यांची व्यापारी पिळवणूक करीत आहेत कामगार मिळत नसल्याने शेती ओसाड पडण्याच्या मार्गावरहोती. परंतु सरकारने हमी भाव देण्यास सुरुवात केल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे. त्यामुळे अनेकजण शेतीकडे वळू लागले आहेत.यंदा प्रति क्विंटल २ हजार ८३ रुपये हमी भाव दिला जाणार आहे. गतवर्षीच्या तुलनेने हमी भावात १४३ रुपयांची वाढ झाली आहे.परंतु तालुक्यात हमीभाव भात खरेदी केंद्र सुरू नकेल्यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांना कमी भावाने धान्य विक्री करावे लागत आहे.येथे शेतकरी भाताचे एकमेव पीक घेतात.लहरी पावसामुळे कधी ओला, तर कधी सुका दुष्काळाचा शेतकऱ्यांना सामना करावा लागतो.भाताचे कोठार समजल्या जाणाऱ्या तळा तालुक्यात खासगी व्यापाऱ्यांची चंगळ सुरू असून ते शेतकऱ्यांच्या गरजेचा फायदा घेऊन कलडीमोलाने भात खरेदी करत आहेत. तालुक्यात भातावर प्रक्रिया उद्योगांचा अभाव असल्याने भात जसेच्या तसे विकले जाते. लाह्या,तांदूळ व पोहे यांसारखे सहकारी उत्पादक उद्योग नसल्याने भाताच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना वेठीस धरले जाते. तालुक्यात भात खरेदी केंद्र सुरू झाल्यास शेतकऱ्याच्या डोक्यावरील आर्थिक भार कमी होऊन खाजगी व्यापाऱ्यांच्या पिळवणूकीतुन शेतकऱ्यांची सुटका होणार आहे. कैलास पायगुडे:-शेतकरी समन्वय समिती प्रमुख तालुक्यात भात खरेदी केंद्र सुरू करणे अत्यंत महत्वाचे आहे रोहा,माणगाव सारख्या तालुक्यात दोन भात खरेदी केंद्र असताना तळा तालुक्यात एकही भात खरेदी केंद्र नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून खाजगी व्यापाऱ्यांचा फायदा होत आहे.भात खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी शेतकरी समन्वय समिती कडून जिल्हाधिकारी व मार्केटिंग फेडरेशन अधिकाऱ्यांना याबाबतीत लेखी निवेदन दिले जाणार आहे. आनंद कांबळे:-तळा तालुका कृषी अधिकारी, तळा तालुक्यात भाताचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते आधारभूत शासकीय भात खरेदी केंद्रसुरू करण्यासाठीशेतकऱ्यांना सहकार्य करणार आहे.

"रस्ता सुरक्षा.. जीवन रक्षा" या उद्देशाने ३४ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान वर्ष २०२४

दै. जनप्रभात
प्रतिनिधी/पनवेल



ऑटो रिक्षा चालक, मालक यांच्या साठी रस्ता सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळा पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट अकॅडमी येथे घेण्यात आली शहराच्या संस्कृतीचा दर्शक असणारा प्रवासी वाहक हा प्रवासी सेवा सुरक्षित पुरविण्यासाठी कर्तव्यदक्ष असतो ,रस्ते नियम सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून समाजात संवेदनशील नागरिक घडावा ह्या उद्देशाने सामाजिक दैनंदिन जीवनात आपत्कालीन व्यवस्थेतील कर्तव्य पार पाडून कायदे व पर्यावरण, प्रदूषण अशा अनेक विषयांशी जोडलेला एक भाग रिक्षा चालक व शहरातील नागरिक जीवन जगत असतो. अनेक सामाजिक प्रश्नांच्या अडचणीतून मार्ग काढत असताना मार्गदर्शन, सन्मान देत प्रबोधन व प्रशिक्षण हा उत्तम पर्याय म्हणून सातत्याने वर्ष भर प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल तर्फे प्रात्यक्षिकाद्वारे जनजागृती, प्रचार ,प्रसार करीत विविध अभिनव उपक्रम कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. यावेळी व्यासपीठावर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाते ,प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी डॉ. शंकर माने, अग्निशामक विभाग कृष्णा राठोड ,शिव वाहतूक सेना अध्यक्ष दिलीप आमले,बाळासाहेब जगदाळे महाराष्ट्र राज्य पंचायत अध्यक्ष मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी आपत्कालीन परिस्थिती अपघात ,दैनंदिन जीवनातील प्राथमिक उपचार पद्धत, व्यसन मुक्ती, अनुशासन, शिष्टाचार पाळत असलेला जवाबदार व्यक्ती सुसंस्कृत समाज घडवत असतो. म्हणून कर्तव्य पार पाडणाऱ्या अनेक वाहनचालकांचे सन्मान सत्कार करण्यात आले व वाहन परवाना साठी उमेदवारी दाखल करणाऱ्या चालकाच्या तोंडी परीक्षा चाचणी मध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हेल्मेट व फुल पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक मोनिका साळुंके ,प्रदीप नांदकर, महेश माने, विशाल नाबदे ,सुयोग पाटील, तसेच विविध विभागातील रिक्षा चालक मालक वाहतूक संघटना पदाधिकारी व प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या कार्यक्रमांमध्ये विशेष सहकार्य करण्यासाठी डिजिटल मोटर सर्विसेस व ज्योतिर्लिंग, स्वस्तिक, सनशाइन मोटर, दीपक, हेरंब, क्लासिक ,ए टू झेड मोटर ड्रायव्हिंग स्कूल व किशोर डिझाईनिंग यांचे विशेष आभार मानण्यात आले.

दैवी आनंदाचा अनुपम उत्सव – निरंकारी संत समागम संत प्रवृत्तीनेच जीवनाचे कल्याण शक्य - सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज

दै. जनप्रभात
महाड/प्रतिनिधी

जीवनात संतांची संगत करणे आवश्यक आहे. संत प्रवृत्तीनेच जीवन खऱ्या अर्थाने सुंदर बनते आणि संतत्वाने युक्त होऊन ते सहजपणे कल्याणाच्या दिशेने अग्रेसर होते. असे शुभाशीष निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या ५७व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या दुसऱ्या दिवशी विशाल मानव परिवाराला संबोधित करताना केले. सद्गुरु माताजींनी जीवनाची सार्थकता समजावताना सांगितले, की जगामध्ये सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्ती विद्यमान आहेत ज्यातून योग्य निवड आपण स्वत: विवेकाने करायची आहे. ब्रह्मज्ञानाने आपल्याला एक विवेकपूर्ण दृष्टिकोन प्राप्त होतो ज्याचा अंगीकार केल्याने आपण सकारात्मक भावाने भक्तीमय जीवन जगू लागतो.महाराष्ट्रात होऊन गेलेल्या पुरातन संतांचे स्मरण करुन सद्गुरु माताजींनी पुढे सांगितले, की समस्त संतांनी जीवनात ईश्वराला प्राथमिकता देण्याची शिकवण दिली आहे. संतांच्या दिव्य वाणीने आपल्या मनातील अहंकार, क्रोध, लोभ इ. आपसूकच गळून पडतात. ज्याप्रमाणे उकळत्या पाण्यात आपण आपला चेहरा पाहू शकत नाही तद्वत मनामध्ये क्रोध, अहंकार व स्वार्थ भावना असेल तर जीवनात काहीही स्पष्टपणे दिसत नाही. शेवटी सद्गुरु माताजींनी सांगितले, की ईश्वराने आपल्याला अनेक प्रकारची क्षमता प्रदान केलेली आहे. आपण हवे तर मूळ मानवी प्रवृत्तीस अनुसरुन एक दैवी जीवन जगू शकतो अन्यथा विपरीत दिशेने गेल्यास दानवी प्रवृत्तीने युक्त होऊन अध:पतित होऊ शकतो. ही निवड आपण स्वत: करायची आहे. संत समागमात निरंकारी राजपिता रमितजी यांनी आपले भाव व्यक्त करताना सांगितले, की सद्गुरुने आपल्याला ब्रह्मज्ञान देऊन नश्वर आणि शाश्वताची ओळख करुन दिली आहे. सत्य आणि माया वेगवेगळी करुन दाखवली आहे. सत्य तेच आहे जे कायमदायम आहे आणि अशा सत्याला प्राप्त केल्यानेच जीवनात शांती नांदू शकते. शांतीची परम अवस्था परमात्माच आहे. त्याच्याशिवाय स्थायी शांती मिळणे शक्य नाही. या एका परमात्म्याला जाणून, मानून त्याच्याशी एकरुप होऊन जीवन जगल्याने सदैवकाळ शांतीची प्राप्ती होते. स्वत:ची इच्छा प्रभु इच्छेत विलीन करुन जीवनात कृतज्ञतेची भावना आली म्हणजे जीवनात शांती येते.संत समागमाच्या तिन्ही मैदानांवर समागमागमात येणाऱ्या सर्व भाविकांसाठी रात्रंदिवस लंगरची (मोफत भोजनाची) व्यवस्था करण्यात आली होती. भाविक भक्तगणांना स्टीलच्या थाळीमधून लंगर वाढले जात होते. या व्यतिरिक्त समागम स्थळावर ५ कॅन्टीनची व्यवस्था करण्यात आली होती ज्यामध्ये विविध खाद्य पदार्थ, चहा, कॉफी, शीतपेये इत्यादि सामग्री अत्यल्प दरात उपलब्ध होती. देशभरातून आलेले भक्तगण सर्व भेदभाव विसरुन एकमेकांसोबत पंगतीत बसून भोजन ग्रहण करताना पाहून अनेकतेत एकता व भ्रातृभावाचे सुंदर उदाहरण प्रस्तुत होत होते. संत समागमात कायरोप्रॅक्टिक थेरपीचे शिबिरही आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये अमेरिका व यूरोपमधून अनेक डॉक्टर्स आपल्या निष्काम सेवा अर्पण करत होते. या शिबिरामध्ये सुमारे हजारो व्यक्तींनी उपचार प्राप्त केले. याशिवाय या दिव्य संत समागमामध्ये इतर अनेक सेवांमध्ये समर्पित भक्तांचा प्रेमाभक्ती व निष्काम सेवेचा भाव दृष्टिगोचर होत होता.

क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव: श्री गणेश बुद्धे





दै, जनप्रभात
परभणी /अरविंद कांबळे

पूर्णा: शहरातील महावीर नगर परिसरातील लिटिल किंग्ज इंग्लिश स्कूल चा दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक स्नेहसंमेलन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.यात विविध खेळ, सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या व कार्यक्रमाचा समारोप शहरातील गोंधळ सम्राट राजारामबापू सभागृहात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाने पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावली एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष श्री गणेश बुद्धे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री काशिनाथ लोखंडे उपस्थित होते.. प्रमुख पाहुणे म्हणून शहर व ग्रामीण परिसरातील प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध एकल नृत्य, समुह नृत्य, अभिनय, नाटके सादर करुन आपल्या कलागुणांना सादर करण्याचा प्रयत्न केला. यात देशभक्तीपर गीते, भक्तीमय गीते यावर विद्यार्थ्यांनी नृत्य व अभिनय सादर केले. चिमुकल्यांनी धार्मिक व ऐतिहासिक वेशभूषा सादर करुन रसिकांची मने जिंकली. अध्यक्षस्थानी असलेल्या श्री गणेश बुद्धे यांनी क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात भर कसे घालतात यांचे यथोचित वर्णन केले व असे उपक्रम सदैव विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतात यावर भाष्य केले. इयत्ता सातवीचा विद्यार्थी सम्यक कांबळे याचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ.मोनिका शिराळे व सौ. प्रतिभा शिरसकर यांनी केले तर आभार कु. कोमल जोंधळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक श्री काशिनाथ लोखंडे यासह श्री जलील अहमद, सत्यनारायण कणसे, पवन असोरे, गजेंद्र ठाकूर, श्रद्धा टाकळकर, मनिषा ढोणे, जोंधळे मिस, वाघमारे मिस, भाग्यश्री मुर्गे, रशिदा बेगम, राधा भारती आदींनी परिश्रम घेतले.

४ फेब्रुवारी पासून भारतीय जनता पार्टी नमो चषकास प्रारंभ

दै,जनप्रभात
उपसंपादक / राठोड रमेश पंडित

अहमदपूर:- भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा च्या माध्यमातून अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ४ फेब्रुवारी पासून नमो चषक २०२४ प्रारंभ होणार असून ज्यास्ती जास्त स्पर्धे कांनी नमो चषक स्पर्धेत सहभागी व्हावे असे अहवान भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख गणेश दादा हाके पाटील यांनी केले आहे. सदरील नमो चषक स्पर्धां ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार असून नमो चषक स्पर्धेत कबड्डी, फुटबॉल, क्रिकेट, मॅराथॉन स्पर्धेबरोबर चित्रकला स्पर्धा, रांगोळी, गितगायन, नृत्य स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, एकांकिका, अशा सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन नमो चषक २०२४ मध्ये केले असून प्रत्येक स्पर्धेसाठी मोठ्या रक्कमेचे पारितोषिक ठेवण्यात आले असून प्रत्येक स्पर्धेसाठी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संयोजन समितीची स्थापना करण्यात आली आली असून स्पर्धेकांनी आपली नोंदणी तात्काळ करून घ्यावी असेही आवाहन भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा निवडणुक प्रमुख गणेश दादा हाके पाटील यांनी केले आहे. स्पर्धकांनी आपली नोंदणी करण्यासाठी युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष रामानंद मुंडे ९९२३२३२२१०, संयोजक भास्कर केंद्रे ९६०४९८८६२८, चाकुर तालुका अध्यक्ष भरत गुरमे ९४२१७१२४२४ यांना संपर्क करून स्पर्धकांनी नोंदणी करून घ्यावी.



खंडाळा ते लाहोरी रस्त्याची बिकट परिस्थिती

दै. जनप्रभात
अमोल झाडे
समुद्रपुर/प्रतिनिधी

तालुक्यातील खंडाळा ते लाहोरी रस्ता अनेक दिवसा पासून विकासाच्या कोसो दूर गेला आहे २००४ पासून त्या रोड कडे कोणत्याही लोकप्रतिनिधी चे लक्ष राहिले नाही. खंडाळा हे तालुक्यात एक साधारण मोठे गाव असून येथून रोज १०० ते १५० विध्यार्थी शाळेमध्ये प्रवेश करतात कारण सर्व कॉलेज समुद्रपूर ला असल्यामुळे विध्यार्थना व तालुक्याचे ठिकाण असल्याने गावातील नागरिकांना २५ ते ३० किलोमीटर फेऱ्याने जाने येणे करावे लागतात . जर खंडाळा ते लाहोरी मार्गाचे रोड चे काम पूर्ण झाले तर फक्त सात किलोमीटर समुद्रपूर पडतो विध्यार्थाना जाण्यासाठी अडचणी उधभवणार नाही.

आम्ही गावातील नागरिक लोकप्रतिनिधी कडे अनेक दा मागणी करून कोणाचेही या कडे लक्ष दिसून येत नाही. जर या रोड चा प्रश्न निकाली न निघाल्यास आम्हला आंदोलन करून रस्त्यावर यावं लागेल रोड चे काम लवकरात लवकर मंजूर करावे अशी मागणी खंडाळा येथील् ग्रामस्थांनी केली त्या वेळी . संदीप झाडें (उपसरपंच ग्राम पंचायत खंडाळा .सत्येशर रणदिवे ,बबन ठाकरे,सुदेश जावदे (लाहोरी) मोहन झाडें, शरद झाडें, रावबा मसराम, संजय खराने, मंगेश ठाकरे, अजय ठाकरे, सुधीर देवढे, व खंडाळा लाहोरी येथील समस्त ग्रामवासीची मागणी आहे.



समाजातील दृष्टप्रवृतीवार मात करण्यासाठी विद्यार्थ्यांनीं सादर केला अंबेआईचा गोंधळ.

विविध स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या विजेत्या चमूंचा गौरव.

दै. जनप्रभात
नरखेड /प्रतिनिधी

जिल्हा परिषद अंतर्गत आयोजित दोन दिवशीय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात पेठ मुक्तापूर येथील उच्च प्राथमिक शाळेने गाजविली. विविध स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी त मोहगाव भदाडे , मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही गटांतील खो-खो स्पर्धेत पेठ मुक्तापूर , मुलीच्या लंगडीत खापरी केणे येथील उच्च प्राथमिक शाळेने बाजी मारली. तसेच सांघिक लोकनृत्य स्पर्धेत जि प प्राथमिक शाळा मेंढला यानी प्रथम क्रमांक पटकावला. मुलांच्या कबड्डी स्पर्धेतवरिष्ठ गटात पेठमुक्तापूर, मुलींच्या कबड्डी स्पर्धेतभदाडे मोहगांव येथील



तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत मुक्तापूरचे ठरले 'चॅम्पियन्स'

करत या चमूने 'चॅम्पियन्स'चा पुरस्कार पटकवला श्री गुरु महाराज आदिवासी विद्यालय येनीकोणी येथे आयोजित क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन जि प सदस्या पार्वती काळबांडे यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून उषा मनीष फुके सरपंच ग्रामपंचायत येनिकोणी, जि प सदस्या दीक्षा मुलताईकर, प.स.सदस्य स्वप्नील नागापुरे, आग्रा ग्रापंचायतचे सरपंच नंदलाल मोवाडे, गटशिक्षणाधिकारी प्रदिपकुमार जनबंधू, शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रहास बडोणे, मुख्याध्यापक गुरु महाराज आदिवासी विद्यालय येनिकोणी राजेश गावंडे, सर्व केंद्रप्रमुख आदीची उपस्थिती होती. मुलांच्या कबड्डी स्पर्धेत कनिष्ठ गटात दावसा , मुलींच्या कबड्डी स्पर्धे प्राथमिक शाळेच्या चमूने अव्वल स्थान पटकावले. मुलांच्या आणि मुलींच्या गटातील खो-खो स्पर्धेत पेठमुक्तापूर शाळेचा दबदबा कायम राहिला. लंगडी स्पर्धेत खापरी केणे उच्च प्राथमिक शाळा, रिले रेस मुले दावसा तर रिले रेस मुली जि प उच्च प्राथमिक शाळा पेठ मुक्तापूर यांनी पारितोषिक पटकावले. सांघिक नृत्य वरिष्ठ गटात जि प उच्च प्राथमिक शाळा पेठमुक्तापूर यांनी प्रथम क्रमांक पटकविला

नैतिक राजीव इरपाची (पेट मुक्तापूर) , एकता सुनील नेहारे,देव रवींद्र उईके, खुशाल गोपाल शेंदरे करण प्रमोद राऊत (दावसा), नेहा दिलीप वरखडे, नैतिक रवींद्र मोरे (पेठ मुक्तापूर), सार्थक राजू गोरे, साहिल गणपत नेहारे (हिवरमठ)आदी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धे त वैयक्तिक कामगिरी करीत पारितोषिके पटकावली

क्रीडा स्पर्धेत मध्ये १०केंद्रातील ३९८ विद्यार्थी १२२शिक्षक तसेच सांस्कृतिक स्पर्धेत मध्ये २१९ विद्यार्थी व ९६ शिक्षक यांनी सहभाग घेतला होता. विजयी स्पर्धकांना सरपंच उषा मनीष फुके, जि प सदस्या पार्वती काळबांडे,दीक्षा ज्ञानेश्वर मुलताईकर, गटविकास अधिकारी डॉ निलेश वानखडे, सर्व केंद्रप्रमुख यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विजय भड व मारोती मुरके यांनी केले तर आभार ललिता सातपुते यांनी मानले पिंपळगाव वखाजीचे केंद्र प्रमुख मदन वनकर,विवेक बोरकर भूषण आगे,दिनेश डवंगे,अमोल अंबाडकर, राजेंद्र सावरकर, संदीप कळंबे,विशाल लाडसे, सुनील उजवने, सोनेकर या शिक्षकानी परिश्रम घेतले.

विद्यार्थी जिवणातच ध्येय निच्छित करा...कपिल हाटकर

विद्या विकास महाविद्यालयात सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

दै. जनप्रभात
ता.प्रतिनिधी/अमोल झाडे



समुद्रपुर :- आपण भूतकाळाचा विचार करून काहीही साधत नाही. भूतकाळ म्हणजे निघून गेलेला काळ जो पुन्हा परत येणार नाही.हे आपल्या मनात ठसवले पाहिजे विद्यार्थ्यांनी ध्येयनिच्छित करून प्रामाणिक प्रयत्न करा भविष्यात काय घडेल कोण कोणत्या पदावर जातील याची माहीती नाही.ध्येय नसले तर जिवण वाया जाते ते कळतही नाही. त्यामूळे विद्यार्थ्यांनो विनाकारण वेळ वाया जाउ देऊ नका एकदा वेळ गेली कि परत येत नाही. म्हणून ध्येय निश्चित करा. उज्वल भविष्यासाठी जीवनमान उंचावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा असे विचार उद्घाटन प्रसंगी तहसीलदार कपिल हाटकर यांनी व्यक्त केले. विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर डरा दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंगजी तुळसकर होते तर उद्घघाटक म्हणून तहसिलदार, समुद्रपूर, कपिल हाटकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून समुद्रपुर पोलीस स्टेशन चे ठाणेदार संतोष शेगांवकर त्याच प्रमाणे विद्या विकास शिक्षण संस्थेचे सचिव .डॉ. उमेशजी तुळसकर त्याचप्रमाणे,प्राचार्य डॉ.किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य डॉ. नयना शिरभाते, डॉ. राजविलास कारमोरे,डॉ. राजकुमार रामटेके, पर्यवेक्षक प्रा.किरण वैध ,सांस्कृतिक महोत्सवाचे संयोजक प्रा. डॉ. विठ्ठोबा चंदनखेडे प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्रत्येकाला आयुष्यात पुढे जाण्यासाठी उत्तम शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तिमत्त्व घडवण्यास मदत करते आपल्याजिवणा येणे टर्निंग पाईंट ओळखून यशस्वी व्हा असे विचार ठाणेदार संतोष शेगावकर यांनी मांडले. तर ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा पुरविणे हाच महाविद्यालयाचा उद्देश असल्याचे सचिव डॉ. उमेश तुळसकर यांनी सांगितले. प्रास्ताविक करतांना प्राचार्य डॉ.किशोरचंद्र रेवतकर यांनी विविध उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने महाविद्यालयातील ग्रंथालय तथा इतर सुविधांचा उपयोग करण्यासाठी प्रोत्साहित केले.याप्रसंगी सेवानिवृत्त प्रा.कल्पना चिट्टटवार,डॉ.विणा मेंढूले,प्रा.मनोज कोरेकर यांचा सन्मान करण्यात आला तसेच क्रिडाक्षेत्रात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रा.स्वाती येवतकर तर आभार प्रा.अजय मोहोड यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक प्रा.डॉ. विठोबा चंदनखेडे, प्रा डॉ. वासुदेव चौधरी, प्रा.फारीश अली प्रा.घनश्याम कदमधाड, प्रा.राजेश बाभुळकर,प्रा.मेघशाम ढाकरे,डॉ नितीन आखूज डॉ सातपुते डॉ. राजेशाम वेलुपुला,डॉ. प्रमोद अलोने,प्रा गंणेश बेले,प्रा.सिल्पा समंदूरकर, प्रा.सदानंद सार्वे, प्रा.डॉ. राजिव कळसकर,डॉ तळे,डॉ. मिलिंद कांबळे प्रा.विलास बैलमारे,प्रा.रत्नाकर आस्कर,प्रा.महेश चिव्हाणे,प्रा मनोज खेकरे,जितेंद्र तोमर,प्रा शिवानी ढाकरे,स्मिता काळे,प्रा चांभारे, प्रा तडस, प्रा प्रीती निजम घनेश रंगारी, प्रदिप कापकर, हर्शल उमरे, मुकेश हुलके, वामनझाडे, संजिव पवारसह एन.सी. सी.कॅडेट, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी ,विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाला विद्यार्थी,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

****

उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य म्हणून डॉ. रामेश्वर पवार यांची निवड यांची निवड

दै, जनप्रभात
परभणी /अरविंद कांबळे



पूर्णा येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर पवार यांची उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य म्हणून नुकतीच निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र ''करियर कट्टा'' महाविद्यालयीन स्पर्धा २०२३-२४ चा नुकताच निकाल जाहीर झाला असून यामध्ये परभणी जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्य म्हणून डॉ रामेश्वर पवार यांची निवड घोषित करण्यात आली आहे. डॉ रामेश्वर पवार यांना या अगोदर महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार मिळाला असून त्यांनी आतापर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पंच्याहत्तर शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.युजीसीचा एक लघुशोध प्रकल्प पूर्ण केला आहे तर बारा ग्रंथ प्रकाशित केले आहेत . महाराष्ट्र शासनाच्या राज्य ग्रंथालय नियोजन समिती, ग्रंथ निवड समिती अशा विविध समित्यांवर कार्य केले आहे.ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापरिषद व अधिसभा सदस्य म्हणून कार्य करत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

रनाळा येथील इंदिरा नगर अंतर्गत सिमेंट करण रस्त्याचे भूमिपूजन

दै,जनप्रभात
प्रतिनिधी / नंदू कोल्हे...

कामठी तालुका अंतर्गत रनाळा येथील वार्ड क्रमांक तीन येथील इंदिरानगर नवीन वस्ती येथे सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन सरपंच पंकज साबळे यांच्या हस्ते व ग्रामपंचायत सचिव राजू फरकाडे ग्रा प सदस्य सुनील चलपे ग्रा प सदस्य मयूर गणेर ग्रा प सदस्य अर्चना ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले प्रसंगी सरपंच पंकज साबळे यांनी गावातील तळागाळातील सर्व नागरिकांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून खास करून सर्व सुविधायुक्त गाव करण्याचे आपले मानस व्यक्त करून जुन्या गावातील विकास कामांना गती देण्याचे काम करून वार्डातील प्रत्येक शासकीय योजनेतील किंवा ग्रामपंचायतच्या सामान्य निधीतून सर्वांगीण विकास साधण्याचे प्रयत्न असल्याचे सांगितले याप्रसंगी प्रामुख्याने ग्रामवासी पोलीस पाटील विशाल आमदरे लोळोबा ठाकरे गीतास बावणे शेषराव आढाव राकेश नितनवरे मनोहर नेवारे नेपाल पारधी बंडू गिरी स्लीप नेवारे दिलीप नेवारे राजू अंबाडरे हरिभाऊ भोजपोंगळे समीर खडसे. शारदा चव्हाण वर्षा पारधी चेतन गिरी विनोद मोगरे दिलीप पारधी जयपाल विजय दलाल विजय जखखनवार अशोक ठाकरे वकलकर सह प्रभाग तीन मधील ग्रामवासी प्रामुख्याने उपस्थित होते



राष्ट्रसंतांच्या विचाराचे आदर्श गाव निर्माण झाले पाहिजे आमदार समिरभाऊ कुणावार

:गिरड येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आमदार समिरभाऊ कुणावार यांचा शब्दयोगी पुरस्काराने गौरव

दै. जनप्रभात
ता. प्रतिनिधी/ अमोल झाडे

समुद्रपुर:- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून आपले गाव कसे आदर्श करता येईल यासाठी अनेक चांगल्या गोष्टी शिकवल्या आहे.मात्र यावर गावातील प्रत्येकांनी अंमलबजावणी करुन राष्ट्रसंतांच्या विचाराचे आदर्श गाव निर्माण झाले पाहिजे असे मत आमदार समिरभाऊ कुणावार कुणावार यांनी गिरड येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५५ व्या पुण्यतिथी महोत्सवात शब्दयोगी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच राजू नौकरकर, मोहगांवचे सरपंच विलास नवघरे, ठाणेदार संदिप गाडे,तालुकाध्यक्ष वामन चंदनखेडे,हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रफुल्ल बाडे ,बाल किर्तनकार उन्नती पानबुडे,महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष विजया तेलरांधे,अरूण मोटघरे,माजी उपसरपंच नुतन गिरडे,मोहन गिरडे, विनोद कन्हाळकर,सुभाष नन्नावरे, ग्रामपंचायत सदस्य राहुल गाढवे निलिमा खडके,करूणा मेढें, हेमलता वैद्य,पत्रकार प्रशांत ठाकूर,आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी आमदार समिर कुणावार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.यावेळी गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आमदार समिर कुणावार यांनी गिरड गावाच्या विकासासाठी दिलेल्या प्रत्येक शब्द पाळुन काम मंजूर करुन दिल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना कार्यसम्राट सोबत आता शब्दयोगी उपाधी देऊन शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन शब्दयोगी पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी त्यांनी गिरड येथे मंजूर केलेल्या २० लक्ष रुपये किंमतीच्या अभ्यासिकेचे भुमिपुजन केले.आमदार कुणावार पुढे म्हणाले की आमदार असो वा खासदार मुख्यमंत्री असो किंवा प्रधानमंत्री सरपंच,ग्रामपंचायत सदस्य हे सर्व जनतेचा सेवक असुन त्यांच्यावर विश्वास करून मायपाब जनता आपली सेवा करण्यासाठी म्हणून निवडून पाठवितात आपल्या लोकशाही प्रधान देशात जनता हि खरी देशाची मालक आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानतून प्रत्येकाला एक मत देण्याचा अधिकार दिला आहे.असुन यात कोण्ही लहान किंवा मोठा नाही ठिक आहे कोण्ही पैशाने लहान मोठे असु शकतात यामुळे पैसाने मोठ्या मानसाने समाजाला आर्थिक मदत करावी तर त्यांच्याकडे पैसा नाही त्यांनी आपल्या श्रमातून मद्दत केली पाहिजे.ईश्वराने मला जनतेची सेवा करण्याची संधी दिली हे माझ्ये सौभाग्य असुन जनतेचा आशिर्वाद हिच माझी खरी कमाई आहे. मी आमदार आज आहे उद्याला राहिल किंवा नाही राहिली यांची मला चिंत नाही पण जोपर्यंत माझ्या स्वासात स्वास आहे तोपर्यंत गोर गरीब जनतेची सेवा करण्यासाठी मला जे करावे लागेल ते मी मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा हे मनात रुजवले असुन ते करतच राहणार असे मत आमदार समिरभाऊ कुणावार यांनी व्यक्त केले.

फसवणुकीप्रकरणी ४ जणांविरुद्ध एफआयआर दाखल

दै. जनप्रभात
कामठ/प्रतिनिधी

त्याच्याविरुद्ध फसवणूक आणि हफ्ता खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर, राजेंद्र सिंह नारायण सिंह यादव यांनी ११ ऑक्टोबर २०२३ रोजी कामठी न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर कामठी न्यायालयाने २०२४ मध्ये १८ जनावरांवर एफआयआर व तपासाचे आदेश दिले आहेत. नवीन कामठी पोलीस ठाण्यांतर्गत बनावट करारनामा पत्र व फसवणूक केल्याप्रकरणी कामठी न्यायालयाने चार जणांविरुद्ध तपास करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार निष्पक्ष तपासासाठी विष्णू त्रिलोकचंद यादव, महेश दीनदयाळ यादव, सुशील झब्बूलाल यादव, डम्पी महेश यादव यांच्याविरुद्ध नवीन पोलीस स्टेशन कामठी येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्लेखनीय आहे की, विष्णू त्रिलोकचंद यादव यांनी कामठी न्यायालयात १५ जुलै २०२३ रोजी राजेंद्रसिंह यादव, रहिवासी यादव नगर, कामठी आणि इतरांविरुद्ध खोटे प्रतिज्ञापत्र आणि खोट्या कागदपत्रांसह नया पोलीस ठाण्यात याचिका दाखल केली होती. त्यावर अर्जदार राजेंद्रसिंह नारायणसिंग यादव यांनी संबंधित एफआयआर रद्द करण्यासाठी उच्च न्यायालय विभागीय खंडपीठ, नागपूर येथे दावा दाखल केला, त्यावर उच्च न्यायालय विभागीय खंडपीठ, नागपूर यांनी कारवाई केल्यानंतर अंतरिम स्थगिती देण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार कळू द्या.मसुशील यादव आणि विष्णू त्रिलोकचंद यादव यांच्याविरुद्ध नया कामठी पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. दुसरी घटना, ३० ऑगस्ट २०२३ रोजी महेश दीनदयाळ यादव, रहिवासी पाण्याची टाकी, रेल्वे चौकी, रामा नगर, कामठी यांनी खोटे प्रतिज्ञापत्र आणि बनावट कागदपत्रे दाखल करून राजेंद्रसिंग नारायणसिंग यादव व इतरांना खोट्या गुन्ह्यात अडकवले, जे अजूनही विचाराधीन आहे. यावर राजेंद्रसिंह नारायण सिंह यादव यांनी १० नोव्हेंबर २०२३ रोजी कामठी न्यायालयात सखोल तपासासाठी याचिका दाखल केली. १ गरपीरऑ जानेवारी, २०२२३ रोजी कामथी कोर्टाच्या आदेशानुसार, विष्णू यादव, महेश देनिंदायल यादव, सुशील झब्बुल यादव आणि डंपी महेश यादव आयपीसी कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १९७, २०९, ३८४, ४०६, १२० बी. आणि कलम ३४ अन्वये नवीन कामठी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुशील यादवविरुद्ध फसवणूक आणि फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार आणि एफआयआर नोंदविण्यासंदर्भात १० ते १५ पीडितांशी संपर्क साधण्यात आल्याचा आरोप राजेंद्र सिंह यादव यांनी केला आहे. सुशील यादव यांनी त्यांच्या शेतातील एक प्लॉट बनवून विकला होता, मात्र त्याची नोंदणी केली नाही. सुशील यादववर अनेक गुन्हे दाखल असून त्याचे साथीदार निरपराध लोकांना खोट्या प्रकरणात अडकवून मोठी रक्कम कमावतात. राजेंद्रसिंह यादव यांनी अशा पीडितांनी संबंधित पोलिस ठाण्यात तक्रार करण्याचे आवाहन केले तसेच पीडितांना मोफत वकील देण्याची ग्वाही दिली. पोलिस उपायुक्त निकेतन कदम, सहायक पोलिस आयुक्त संतोष खांडेकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद पोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

माजी नगरसेवक कपिल गायधने भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी



दै. जनप्रभात
नंदू कोल्हे/ प्रतिनिधी

कामठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी माजी नगरसेवक कपिल गायधने यांची भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावर नियुक्ती केली. कपिल गायधने यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे आभार मानले. पक्षाला मजबूत करण्यासह पक्षाची ध्येय धोरणे, विचार, पक्षाचे काम तळागळातील व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश महामंत्री विक्रांत दादा पाटील. मोर्चा राहुल लोणीकर, जिल्हा अध्यक्ष सुधाकर कोहळे, प्रदेश महामंत्री शिवानीताई दानी, बादल कुलकर्णी, अनुप मोरे, माजी जि. प. सदस्य अनिल निधान, अजय अग्रवाल, आमदार टेकचंद सावरकर, मनिष वाजपेयी, आशिष फुटाणे, रोहित पारवे, संकेत बावनकुळे, पंकज वर्मा, राजेश खंडेलवाल, भाजप कामठी शहर अध्यक्ष चंद्रशेखर तुप्पट यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.